पण हे बूट येथे वापरणार कोण। कारण मी थोडीच बूट घालून ऑफिसला जाणार। आणि हे असे बूट घालून फिरणार नाही, याची मला खात्री होती मग माझ्या डोक्यात एक कल्पना आली ती म्हणजे थोडे दिवस ते बूट दादाना वापरण्यास देणे, दादा म्हणजे माझे सासरे, श्री गोपाळ गावडे. आमच्या घराच्या मागे एक उंच टेकडी आहे. त्या टेकडीवर ते रोज सकाळ सध्याकाळ फिरावयास जातात त्यानी पण ते हटरबूट वापरण्यास आनदाने होकार दिला कधी कधी मी पण ते हटरबूट घालून सरावासाठी आमच्या गच्चीवर फेऱ्या मारू लागले परतु ते बूट घालण्यात व त्याच्या नाड्या बाधण्यातच खूप वेळ जायचा एकूण पुढची सर्व परिस्थिती कठीणच वाटत होती

मगला आणि मी खर म्हणजे जुळ्या बहिणी नाही पण दोघींच्या चेहऱ्याच्या ठेवणीमध्ये इतक साम्य आहे की लहानपणी चाळीतली माणससुध्दा फसायची, त्याची खर म्हणजे आम्हालाही गमतच वाटायची. पण हिमालयाच्या कुशीत ट्रेकींगसाठी चाललेल्या आमच्या मित्रमैत्रिणींची तरी तशी फसगत होऊ नये अशीच आमची प्रामाणिक

इच्छा होती म्हणूनच आम्ही दोघी बहिणी एका वेळी, एकाच रंगाचे आणि सारख्याच फॅशनचे कपडे वापरायचं आवर्जून टाळत होतो वेगवेगळ्या रंगाचे आणि निरनिराळ्या फॅशनचे ड्रेस अंगावर घालून आपापलं वेगळं व्यक्तिमत्व ठळकपणे लोकांपुढे ठेवण्याचा जमेल तेवढा प्रयत्न करायचं आम्ही ठरवलं पण हाय ऽ

रंगाने जरी मी सावळी आणि माझी मोठी बहीण मंगला, ही जरी गव्हाळी, असे असलो तरीही, आम्हा दोघींच्या चेहऱ्याच्या साम्यामुळे, एकदा एका खेळाच्या वेळी आमच्या ट्रेकींगवाल्या मित्रांची फसगत झाल्याचं पाहून, मी तर चाटच पडले पण तो किस्सा विस्तरपणे पुढे योग्य ठिकाणी सूज्ञ वाचकांना वाचायला मिळणारच आहे

तेव्हा पुढे काय झालं ते आता पाहू या। ---

□ ■ □ ■

# सोळा मे त्र्याण्णव

अखेर ज्या दिवसाची मी अत्यत आतुरतेनं वाट पहात होते तो, १६ मे, १९९३ हा दिवस उजाडला

कल्याण, ह्या माझ्या निवासस्थानावरुन मी माझ लगेज घेतल, ट्रेन पकडली आणि पुण्यनगरीचे प्रवेशद्वार असलेल्या पुणे रेल्वेस्टेशनवर उतरले तिथे आमचा ग्रुप जणू काही माझीच वाट पहात होता. मी आनदाने त्याच्यात मिसळले

ह्या ग्रुपमध्ये माझी बहीण मंगला, जे जे रुग्णालयाच्या मेट्रन देशमुख मॅडम, आमच्या एम टी एन एल मधली माझी मैत्रीण नयना आगरकर, तसेच माझ्या बहिणीची एक मैत्रीण मीना, आणि साईनाथ शिंदेसह इतर आणखी वीस , पचवीसजण, म्हणजे आमच्या ग्रुपमधले एकतीस, बत्तीसजण तिथे होते सर्वांचे चेहरे हिमालयावर स्वारी करण्याच्या तयारीने प्रफुल्लित आणि उत्साहित झालेले दिसत होते

आमच आरक्षण 'झेलम एक्सप्रेस'च होत पाच वाजून चाळीस मिनिटानी झेलम एक्सप्रेस दिल्लीकडे तोंड करून झुक् झुक् अशी सुसाट धावू लागली पण माझ मन मात्र मागे, मागे माझ्या घराकडे रेंगाळत होत

माझी सजल अवधी तीन वर्षांची, ती काय करीत असेल? माझे पती अशोक, तसेच माझे सासू-सासरे हे तर माझीच काळजी करीत असणार चक्क पधरा दिवस मी, ह्या माझ्या जिवाभावाच्या प्रेमळ माणसापासून अती दूर, अगदी हिमालयात जाऊन

राहायच, म्हणजे छातीवर प्रचड शिळा ठेवूनच राहण्यासारख होत. म्हणूनच मी, एका अर्थान तशी दु:खी होते परतु माझ दुसर मन मात्र, हिमालयाच्या पवित्र दर्शनासाठी झेलम एक्सप्रेसपेक्षाही जास्त वेगान पुढे पुढे धावत सुटल होत म्हणूनच माझ्या चेहऱ्यावर हसू आणि आसू याचा मिलाप होता कारण माझ्या कुटुबियाचे चेहरे माझ्यासमोर तरळत असतानाच, पुण्याच्या 'युवाशक्ती'च्या लोकानी, झेलम एक्सप्रेस सुटण्याच्यावेळी, पुणे स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर आम्हाला दिलेल्या हार्दिक शुभेच्छा, त्याचप्रमाणे आम्हीही आमचे हात, हवेत उचावून, हसत मुखाने त्या शुभेच्छाचा केलेला स्वीकार, हे आठवताच माझ मन सुखावत होत आपण ज्या ट्रॅकिंगसाठी हिमालयात जात आहोत ती कामगिरी यशस्वीपणे पार पाडूनच आपण परतायच अशाही एका आत्मविश्वासान, एका जिद्दीन माझ मन भारावून गेलेल होत कारण, आमच्या ग्रुपच्या पाठीशी भरभक्कमपणे उभी होती, ती पुण्याची 'युवाशक्ती' ही एक समर्थ सस्था

पुण्याची 'युवाशक्ती' ही सस्था, तशी सामाजिक कार्यात आणि पदभ्रमण, ट्रेकिंग या क्षेत्रात एक विश्वसनीय सघटना आहे 'युवाशक्ती' आणि 'कुमाऊ मडळ विकास निगम' याच्या सयुक्त विद्यमाने आयोजित 'पिंडारी-काफनी ग्लेशियर' ट्रेकिंगसाठी आमचा ग्रुप चाललेला होता आमच्या आधीही महाराष्ट्रातल्या युवक व युवतींचा एक ग्रुप ह्याच सस्थेच्या वतीने गेलेला होता अशा तऱ्हेने एकूण नऊ ग्रुप पाठविण्याची सदरहू सस्थेची योजना आहे असही आम्हाला सागण्यात आल अशा तऱ्हेने भटकती करायला पाठविणारी 'युवाशक्ती' ही बहुधा एकमेव उल्लेखनीय मान्यवर सस्था असावी.

आमच्या ग्रुपचा, ग्रुपलीडर, म्हणून मुबईमध्ये अधेरी येथे राहाणाऱ्या एका उमद्या आणि उत्साही तरुणाची नेमणूक झालेली होती; त्याच नाव होत, साईनाथ शिदे. त्याने

आमच्यातील प्रत्येक सदस्याला एक छोटी पॉकिट डायरी आणि दोन दोन बिल्लेही दिले

एका बिल्ल्यावर 'पिंडारी-काफनी ग्लेशियर्स ट्रेक युवाशक्ती, पुणे' अस लिहिलेल, तर त्याच बरोबर एका गिर्यारोहकाच चित्रही काढलेल होत. तर दुसरा बिल्ला पाढऱ्या रगावर हिरव्या रगाची फुली केलेली आणि त्याखाली होत एक बोधवाक्य 'पर्यावरण वाचवा' "SAVE ENVIRONMENT" प्रत्येकान एक बिल्ला डोक्यावरच्या कॅप ला आणि दुसरा अगावरच्या ड्रेसला लावला ते पाहून मीही माझे बिल्ले तसेच लावले

आम्ही मुबईहून आलेलो दहा जण होतो, तर, इतर मडळीमध्ये बहुतेक मडळी पुण्याचीच दिसत होती

काहीही म्हणा, पुण्याचे लोक मात्र फारच उत्साही दिसत होते त्यामुळे आमचाही उत्साह दुणावला होता पुण्याची अर्चना नावाची मुलगी आमच्या मुबईच्या ग्रुपमध्ये चागलीच मिसळून गेली तिला आमच्या मुबईच्या चार, पाच मुलींचा ग्रुप खूपच आवडलेला दिसत होता कारण अर्चना सपूर्ण ट्रेकिंगच्या मोहीमेमध्ये अगदी शेवटपर्यंत आमच्याच बरोबर राहिली. पण, अर्चनाप्रमाणेच 'नतर, मयुरी, शमा, करिश्मा, प्रीती,शलाका, वर्षा तसेच स्वाती इत्यादी मुलीसुद्धा अगदी सहजगत्या आमच्यात मिसळून गेलेल्या होत्या अगदी दुधात साखर मिसळावी ना तशा त्यामुळे हास्य विनोद, फिरक्या, गिरक्या आणि गप्पागोष्टी करता करता आमच्या आगगाडीतल्या प्रवासाचा वेळ कसा मजेत जात होता

आगगाडीच्या बाहेर मी पाहिल गुडुप 'अधार आगगाडीच्या आत बाहेर नीरव शातता पसरलेली अशा ह्या नीरव शाततेत कानावर आदळत होता तो धडाक् धडाक् असा आगगाडीचा लयबद्ध आवाज स्टेशनामागून स्टेशन मागे टाकीत आमची आगगाडी एखाद्या पिसाळलेल्या वाघिणीसारखी अधाराचा वेध घेत धावत होती





सावलीतला हिमालय काफनीकडे



काफनी कडे

मी, माझ्या मनगटी घड्याळात पाहिल. रात्रीचे नऊ वाजलेले.

अरेच्चा! म्हणूनच माझ्या पोटात भुकेचे कावळे काव काव करताहेत वाटत!

मी, मनातल्या मनात म्हटल

पण इतरानीही ते ऐकल की काय कुणास ठाऊक!

प्रत्येकजण आपापला जेवणाचा डबा पोतडीच्या बाहेर काढू लागला.

ते पाहून मी पुन्हा माझ्या मनातल्या मनात पुटपुटले. 'भूक' ही गोष्ट सार्वत्रिक असते. एकाद्या कुणाला भूक लागली की इतराच्याही भुका चाळविल्या जातात. नेमक तसच झाल

जेवणासाठी सगळ्यानी आपापले डबे उघडले.

मगलने घरुन खास तयार करुन आणलेल्या होत्या मैद्याच्या तिखट पुऱ्या त्याला 'एडमें' असही म्हणतात

देशमुख मॅडमनी आणलेला 'ठेचा' म्हणजे हिरव्या मिरच्या आणि लसूण आणि मीठ याची चटणी. त्याला 'खरडा' असही म्हणतात याची चव तर अजूनही माझ्या जीभेवर रेंगाळत आहे

जेवण झाल्यावर साईनाथ शिंदेन स्वीट डीश म्हणून खोबऱ्याच्या करज्या वाटल्या त्या खाऊन आम्ही तृप्तपणे ढेकर दिले आणि मगच कुठे आम्ही आपापल्या बर्थकडे वळलो

आगगाडीचा तो सपूर्ण डबा, जवळ जवळ आमच्याच ग्रूपच्या ताब्यात असल्यामुळे आम्ही सगळेजण मग बिनधास्तपणे निद्रादेवीच्या स्वाधीन झालो

# सतरा मे त्र्याण्णव

दुसऱ्या दिवशी म्हणजे, १७ मे, १९९३ रोजी ट्रेनमध्येच आमची चहा, न्याहरी झाली

बराच वेळ आम्ही गाडीच्या बाहेर पहात बसलो होतो. गार वाऱ्याच्या हळुवार लहरी अंगावर झेलत होतो. पण वेळ काही जाता जात नव्हता घड्याळाचा काटा जणू काही गाल फुगवून बसलेलल्या एखाद्या हट्टी मुलासारखा बसल्या जागेवरुन पुढे सरकता सरकत नव्हता वेळ कसा घालवावा हाच जणु काही एकमेव प्रश्न दत्त म्हणून आमच्या पुढ्यात उभा राहिलेला

पण, प्रत्येक प्रश्नाच उत्तर असतच, तसं आमच्याही प्रश्नाला आमच्या मीनानं उत्तर शोधून काढल ते असं,

मीनान सौंदर्य प्रसाधनाचा कोर्स शिकून पूर्ण केलेला होता.

मग काय, वेळ घालविण्यासाठी तिनेच स्वतःहून पुढाकार घेतला तिने माझं, नयनाच, आणि मंगलाच छानपैकी फेशीयल केल

दुपारच्या वेळी आगगाडीत फारच उकडायला लागलं. अंगातून घामाच्या सतत धारा वाहायला लागल्या घसा कोरडा पडला. तहान लागली वॉटरबॅगमधल्या पाण्यान काही तहान भागेना मग आम्ही देशमुख मॅडम यानी आणलेली मातीची सुरईदार गर्दन असलेली पाण्याची सुरई पाहिली. देशमुख मॅडमच्याही ते लक्ष्यात आल त्यांनी त्या सुरईतल थडगार

पाणी प्याले भरभरू आम्हाला दिल आणि ते साध पाणी नसून जणू काही 'सजल'च (अमृतच) आहे अस आम्हाला वाटल कारण ते पाणी पिऊन आमची तहान भागलेली होती आम्ही सगळेजण पोटभरल्यासारखे तृप्त झालो होतो

आगगाडी पुन्हा सुरू झाली. धावू लागली. एखाद्या स्टेशनावर ट्रेन थाबली की आम्ही भराभर ट्रेनच्या बाहेर पडायचो प्लॅटफॉर्मवर पाय मोकळे करायचो. त्या स्टेशनाची टेहळणी करायचो इथे एक गोष्ट मला निश्चित सांगाविशी वाटते ती अशी की मराठीमध्ये एक म्हण आहे, 'कुठेही जा पळसाला पान तीनच' ह्याच धरतीवर मला म्हणावस वाटत की 'भारतात कुठेही जा, रेल्वेस्टेशन सगळीकडे सारखच'

आमच्या ट्रेनमधून अशा तऱ्हेने फलाटावर उतरून फलाटाच निरीक्षण केल्यामुळेच आम्हाला काही ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची असलेली रेल्वे स्टेशनही जवळून पहायला मिळाली. त्यापैकी झाशीच्या राणीची आठवण करून देणार, 'झाशी', ताजमहालची आठवण करून देणार 'आग्रा' ही रेल्वेस्टेशन पहाताना सपूर्ण इतिहास आठवला त्याचप्रमाणे आगागाडी जेव्हा 'चंबळ'च्या खोऱ्याला बगल देत पुढे धावू लागली तेव्हा तर अगावर काटा उभा राहिला. चबळचे खोरे म्हणजे दरोडेखोराचे वस्तीस्थान. पण अशा वस्तीत रहाणाऱ्या खूनी दरोडेखोराच हृदय परिवर्तन करून त्याना पुन्हा त्यांच्या कुटूबियासमवेत माना सन्मानान जगायला शिकवल ते सुद्धा, सह्याद्रीच्या कडया कपारीत जन्माला आलेल्या आणि सर्व जगताला ललामभूत झालेल्या आचार्य विनोबा भावे ह्या सर्वोदयी महापुरुषान त्याची आठवण होताच माझी छाती अभिमानान भरून आली नसती तरच नवल।

परतु ट्रेनच्या बाहेरचे फलाटफार्म पहाण्याचासुद्धा आम्हाला कटाळा आला त्यापेक्षा ट्रेनमध्येच बसून गप्पागोष्टी मारीत किंवा भेंड्या लावण्यात आम्ही रस घेऊ लागलो मीही त्याच सधीची वाट पहात होते मी माझी कवितेची

डायरी बाहेर काढली. काही कविता आणि वात्रटिका वाचल्या दुसऱ्यानीही मग काही विनोद चुटके सांगितले. अशा तऱ्हेन बसल्या बसल्याच टाईमपास करीत असताना आमची 'झेलम एक्सप्रेस' दिल्लीच्या प्लॅटफॉर्मला केव्हा येऊन थडकली, ह्याचा आम्हाला थांगपत्ता ही लागला नाही

आम्ही आपापल समानसुमान बारकाईन तपासून, ते आपलच आहे, ह्याची खात्री करूनच उचलल आणि ट्रेनच्या बाहेर पडलो. आमचे पाय दिल्लीच्या फलाटाला लागले तोच, दिल्लीत उतरल्यावर कुणाही VIP च स्वागत व्हाव, तसच आमचही जोरदार स्वागत पावसाने केल फलाटावर आमच्या भोवती हमालाची फलटण जमा झाली त्यातल्या एका हमालाकडे आम्ही चौघी पाच जणींनी आमच लगेज सोपवल आणि त्याच्या पाठोपाठ हळूहळू आम्ही चालू लागलो पण पाहते तर काय, तो हमाल मात्र सोसाट्याच्या वाऱ्यासारखा धावत सुटलेला त्याच्यामागे आम्हालाही धावाव लागल आणि त्याच्यामागे धावता धावता आमची पळता भुई थोडी झाली. तशाही परिस्थितीत माझ्या कवितेने नको तिथे उचल खाल्ली ती अशी,

"दिल्लीत उतरता, उतरता
पाऊस आला स्वागता
त्रेधातिरपिट उडाली
हमालाच्या मागे धावता धावता

आणि त्याचवेळी मला, डोक्यावर ओझ घेऊन पुढे धावत जाणारा हा हमाल,

'धन्याचा तो माल,
मी, तो हमाल
भारवाही"

असा संत तुकाराम महाराजाचा अभंग तर गुणगुणत धावत नसावा ना, असंही वाटल्याशिवाय राहिल नाही.

दिल्लीतील हॉटेल कॅपिटलमध्ये राहाण्यासाठी आमच रिझर्वेशन करण्यात आलेल होत हे हॉटेल, दिल्लीच्या रेल्वेस्टेशनापासून बरच लाब होत तिथे 'बस'नेच जाव लागणार होत पण तिकडे जाणारी 'बस' रेल्वेस्टेशनपासून दूर असलेल्या एका बसथाब्यावरून जात होती पाऊस तर पडत होता पण त्याला काही इलाज नव्हता रेल्वेस्टेशनात ताटकळत बसण्यापेक्षा आपल्या मुक्कामाला पोंहोचणच आम्ही पसत केल मग, काय, आम्ही आमच्या बॅगा, चक्क आमच्या डोक्यावर घेतल्या, आणि बसथाब्याच्या दिशेने चालायला सुरुवात केली

पावसात चिब भिजूनी
रस्त्याला लागलो,
डोक्यावर बॅगा घेऊनि।

हे दृश्य दिल्लीकरानी अगदी पहाण्याजोग होत परतु, ते पहाण त्या बिचाऱ्याच्या नशिबी नव्हत त्यावेळी रात्रीचे अकरा वाजून गेलेले होते आणि ह्यावेळी दिल्लीकर हे नक्कीच आपल्या डोक्यावरून गरम ब्लॅन्केट घेऊन गाढ झोपी गेले असावेत कारण रस्त्यावर आमच्या ट्रेकींगवाल्या ग्रुपशिवाय दुसर कुणीही दिसत नव्हत

आम्ही आम्हाला हव्या असलेल्या बसथाब्याजवळ आलो तिथे 'बस' उभी असल्याच पाहून आम्ही नि श्वास टाकले आणि भराभर त्या बसमध्ये चढलो 'बस' सुरु झाली

कॅपिटल हॉटेलच्या दिशेने धावू लागली कॅपिटल हॉटेलजवळ येताच आम्ही सगळेजण 'बस' मधून खाली उतरलो आणि हॉटेलात प्रवेश केला

आम्ही आपापली ओझी एका प्रशस्त हॉलमध्ये आणून ठेवली तिथे अनेक गाद्या अथरलेल्या होत्या आम्हाला वाटलं होत, आमच्यापैकी एकेकाला एकएक 'रूम' मिळेल पण, तिथे तशी काहीच व्यवस्था नव्हती.

आम्हा महिलासाठी 'तो' एक सार्वजनिक हॉल होता

आणि पुरुष मडळीसाठी हॉलच्या बाहेर पथाऱ्या अथरलेल्या होतया खर म्हणजे एखाद्या धर्मशाळेत याव तस मला वाटल कारण बाथरूमची व्यवस्था सुद्धा महिलासाठी एक आणि पुरुषासाठी एकच बाथरूम अशीच होती

डोळे मिटून जायच व तोंड बद करून घ्यायच कारण आपल्याला आता येईल त्या दिवसाला व वेळेला तोंड द्यायच म्हटल्यावर आपल तोंड बद - ठेवलेलेच बर नाही का? बर असो

सकाळी बाथरूमसाठी फार गर्दी होईल व त्यात वेळ जाईल या भीतीने आम्ही महिलानी आमच्या आधोळी रात्रीच उरकल्या, फ्रेश झालो, आणि मगच तिथल्या गाद्यावर अग टाकल

# अठरा मे त्र्याण्णव

पहाटे साडेपाचला उठलो सर्व काही पटापट आटपल तयारी केली आणि बॅसथाब्याजवळ गेलो

तशी दिल्लीला यायची ही माझी पहिलीच वेळ होती त्यामुळे दिल्ली मला नवीन होती. म्हणूनच मी अत्यत नवलाईने दिल्लीच व दिल्लीकराच निरीक्षण करीत होते. ह्या राजधानीच्या शहरामध्ये चोऱ्या फार होतात. अशी माहिती आम्हाला देण्यात आलेली होती.त्यामुळे माझ दिल्ली निरीक्षण चालू असताना मी लगेजकडे दुर्लक्ष केलेल नव्हत.

ठीक साडे दहा वाजता आम्ही 'हलदानी' गावाकडे जाणाऱ्या बसमध्ये बसलो

'बस' 'हलदानी'च्या दिशेने भरधाव धावू लागली काही अतर कापून झाल्यानतर आमची 'बस' मध्येच एके ठिकाणी थाबली

तो, रस्त्याच्या कडेलगतचा एक 'धाबा' होता

त्या धाब्यावर आम्ही पराठा-छोलेची चव चाखली तसेच तेथील प्रसिध्द 'चाट' खाऊन मी चाटच पडले. कारण ते चाट म्हणजे निव्वळ कादा कापून त्याचे बारीक तुकडे टाकलेले तिखट वाटाणे होते.

दुपारी बरोबर साडेतीन वाजता आमची 'बस' हलदानी गावात येऊन थाबली

हलदानी येथील कॅम्पलीडर श्री. गणेश बोरकर यानी

बसस्टॅन्ड जवळच आमच स्वागत केल त्यानी आमची राहाण्याची व्यवस्था हॅाटिल जगदीशमध्ये केलेली होती

हॅाटिल जगदीशमधली सोय फारच उत्तम व छान होती हॅाटिलच्या गच्चीवरून चारी बाजूला डोंगर दिसत होते. हलदानी हे डोंगराच्या कुशीत लपलेल गाव तस छोटसच, पण, फारच लोभस्ववाण वाटल

सध्याकाळी आम्ही सर्वजण त्या गावात फिरावयास गेलो. त्या गावात फिरत असताना आम्हाला एके ठिकाणी 'दूरध्वनी केंद्र' असा फलक दिसताच माझी पावल थबकली दूरच्या किंवा अनोळखी, गावी आपल एखाद ओळखीच माणूस भेटाव, त्याप्रमाणे त्या M T N L चा बोर्ड पाहून मला वाटल.। ऑफिसात जाऊन तिथल्या माणसाना भेटाव अशी मला इच्छा झाली

मी आणि नयना त्या ऑफिसात गेलो

आमच्या मुबईला साहेबाची जेवढी केबीन आहे तेवढच ते "दूरध्वनी केंद्र" होत

एका छोट्याशा खोलीत एक दोन टेबल खुर्च्या, एकच छोटासा टेलिफोनचा बोर्ड, तिथे चार पाच जण काम करीत बसलेले त्याना आम्ही आमची ओळख करून दिली आणि त्याना आम्हीही M T N.L मध्येच काम करणाऱ्या मुली आहोत अस सागितल तेव्हा त्याना आमच्याविषयी आपुलकी वाटली त्याचे चेहरे आनदाने उजळले

त्यानी आम्हाला शुभेच्छा दिल्या ऑफिस छोट असल तरी तिथली माणस, मोठ्या मनाची. हे पाहून मला माझ्या M T.N आम्हीचा तेअभिमानवाल्डीटलङतरलो हलदानी गावच्या बाजारातून गेलो तिथे थोडस शॉपींग केल आणि जगदीश हॉटेलकडे परतलो.

जगदीश हॉटेलच्या गच्चीवरच छोटस कॅन्टीन आहे तिथे मगलाने आमच्या रात्रीच्या जेवणासाठी बटर चिकनची आगाऊ ऑर्डर दिली होती आम्ही गेलो तेव्हा आमच

जेवण तयार होत. आम्ही बटर चिकनवर ताव मारला फारच सदिष्ठ चव होती म्हणून आमच जेवण तस नेहमीपेक्षा जास्तच झाल तरीही कुणाला तसा काही त्रास झाला नाही.

दुसऱ्या दिवसासाठीसुद्धा मगलाने त्याच कॅन्टीनमध्ये आलो परोठयाची ऑर्डर देऊन टाकली

रात्री दहा वाजता कॅम्प फायरला आम्ही जगदीश हॉटेलच्या गच्चीवरच बसलो होतो तिथे सर्वांनी आपापला परिचय करून दिला आमच्या एकतीस जणाच्या ग्रुपमध्ये तसे सर्वच वयोगटातले लोक होते श्वेता व शौनक ही दोन छोटी मुल, तर सर्वात वयस्कर श्री अभ्यकर व श्री पुडलीक काका हे होते. सुखेदू आणि देवेंद्र ही पण तशी छोटीच मुलं होती आणि बाकी सगळे विशीपासून पस्तीशीतल्या वयोगटातले होते खर म्हणजे आमच्या ग्रूपला एका मोठ्या एकत्र कुटुबाच रूप प्राप्त झालेल होत.

कॅम्पफायर मध्ये श्री पेठे यानी कोडी, तर मयुरी, शौनक यानी चुटके सागितले मी ही माझ्या वात्रटिका आणि कविता वाचल्या त्याचा सर्वांनीच आनद लुटला माझ्या एका वात्रटिकेने तर धमालच उडवली ती वात्रटिका अशी,

"मला पाहूनी एकटीला
जवळ तो आला
गरगरा फिरू लागला-
भोवती माझ्या,
पिंगाही घालू लागला,
हैराण करी जीवाला
तरी लाज नाही त्याला,
कितीदा झटकले
तरीही तो भिडू पाहे अगाला
सधी साधूनी मेला
अखेर चावून गेला,
कटाळले याच्या त्रासाला
अशा ह्या दुष्ट डासाला

चावणाऱ्या डासावर मी वाचलेल्या वात्रटिकेचे सर्वांनीच टाळ्या कौतुक केल

त्यानतर आमचा ग्रुपलीडर साईनाथ याने आणलेल्या दोन कलिगडाचा सर्वांनी फडशा पाडला रात्र खूपच झाली होती. रात्रीचे ११ वाजून गेले होते हे पाहून आम्ही आमची बैठक मोडली. आणि विश्रांतीसाठी आपापल्या निवासस्थानाकडे वळलो

□ ■ □ ■

# एकोणीस मे त्र्याण्णव

सकाळी आम्ही आरामातच उठलो छान आघोळ करून गच्चीवर जाऊन चहा फराळ घेतला ठीक ८ १५ ला आम्ही बसने बागेश्वरला जाण्यासाठी निघालो हलदानी ते बागेश्वर हा आठ तासाचा प्रवास हा सपूर्ण प्रवास घाटातून आहे सरळ रस्ता कुठे नाहीच थोडक्यात म्हणजे वळणावळणावर वळण आहे आठ तासाच्या प्रवासात आमच्या बसने किती डोंगर मागे टाकले याचा मला थागपत्ताच लागला नाही कारण कधीही बसच काय, पण कोणतेही वाहन, मला न लागणारं, पण, मला या प्रवासात फारच त्रास झाला उलटी, चक्कर याच्यासाठी दर दोन तासानी मला गोळी घेण्यास मगला भाग पाडत होती पण या अवस्थेतही मी बाहेरच निसर्गसौंदर्य न्याहळत होते मध्ये मध्ये बस थाबताच तेथील पहाडी लोक पहाडी फळे विकावयास आणीत या फळात एक करवदाच्या आकाराचे आणि लाल रगाचे एक फळ आहे. या फळाचे नाव आहे 'फागल' आणि काय सांगू हे फागल खाल्यावर आम्ही सर्वजण अगदी पागल झालो. माझ्या पण हरवलेल्या जिभेवर चव आली संपूर्ण बस प्रवासात आम्ही

फागल चघळत होतो

मध्ये 'गरमपानी' ह्या ठिकाणी आम्ही उतरलो "जल्दी खाना खा लेना।" अस कडक्टरने बजावले 'गरमपानी' म्हटल्यावर आम्हाला वाटले, येथे आता मस्त गरम पाण्याने तोंड हात पाय धुऊ म्हणजे गाडीतली मरगळ निघून जाईल व आखडलेले शरीर पण ताजे तवाने होईल पण कसल काय, 'गरमपानी' या ठिकाणी साध जेवण, पण गरम नव्हत,तर आम्हाला पाणी गरम कोण देणार। मगलाने हलदानीवरुनच आलू पराठे आणले होते म्हणून बर झाले मग तेच पराठे आम्ही दह्याबरोबर खाल्ले आमची उद्याची सोय केलेली असताना आजच ते खाण्याच्या सवयीमुळे साईने आमच्या म्हणजे आमच्या पाच, सहा जणींच्या ग्रूपला स्लोगनच देवून टाकली "जिथ जाऊ तिथ खाऊ" पण नतर पुढे मात्र आमच खाण कमीच झाल बहुतेक सर्वांची नजर लागली असावी

आमच्या बसमध्ये एक युरोपियन साधू बसलेला होता त्याच्याशी ओळख करून घेतली. त्यान बरच काही तत्वज्ञान आम्हाला पाजल. आम्ही बसमधून किती वेळा खाली उतरलो काही काही घेऊन खाल्ले. तोंड आमचे चालूच होते. बोलायच तरी नाहीतर खायच तरी परंतु सपूर्ण प्रवासात हा साधू मला काही त्याच्या जागेवरून उठलेला दिसला नाही किंवा काही खातानाही तो दिसला नाही. तरी सुद्धा त्या साधूचा चेहरा किती टवटवीत, तेजस्वी दिसत होता बागेश्वरच्या अगोदरच्या एका स्टेशनावर तो साधू उतरला त्याचा तेथे आश्रम होता

खाता-खाता आमचा बसप्रवास चालूच होता. बसच्या बाहेर दिसणाऱ्या हिरव्यागार वनश्रीने डोळे अगदी सुखावलेले, तर मन प्रफुल्लित झालेले निसर्गाचे अवलोकन करता करता माझे मन केव्हाच निसर्गाशी एकरूप झालेले. तेथील डोंगराना पायऱ्या पायऱ्या आहेत. म्हणून तेथे पायऱ्या पायऱ्याची शेती

आहे या पायऱ्या पायऱ्याच्या शेतीमुळे सर्व डोंगर हिरव्यागार साडीच्या जणू निऱ्या पसरवून बसल्यासारखे भासत होते बस मधून जात असतानाच मी, निसर्गसौदर्य टिपून घेत घेत, निसर्गाचा आस्वाद घेत असतानाच, आमची बस सध्याकाळी पावणेसहाच्या सुमारास जि. अलमोडा बागेश्वर येथे पोहोचली 'कुमाऊ मडळ विकास निगम रेस्ट हाऊस' मध्ये आमचा बेस कॅम्प होता बसमधून उतरल्यावर आमचे स्वागत तेथील कॅम्पलीडर समीर कुलकर्णी आणि श्री भिडे काका यानी केले समीरने आम्हा सर्वांना फ्रेश होऊन रेस्ट हाऊसच्या बाहेर असलेल्या गार्डनमध्ये बोलाविले

सस्थेचे प्रमुख श्री विवेक देशपाडे यांनी साईला सागितले "थडी भरपूर आहे गरम कपडे भरपूर न्या हवामान चागले आहे तोवर पिंडारी- काफनी झिरो पॉईट करा मी नुकताच जाऊन आलेलो आहे घाई न करता आपापल्या वेगाने चालत रहा निगमने सगळी सोय पुढची केलेली आहे "युवा शक्ती"चे अनुभवी कॅम्पलीडर अवश्य कॅम्पवर असणार आहे" एवढ सागून त्यानी आम्हाला शुभेच्छा दिल्या हिमालयातील रागा म्हणजे भटक्याचे नदनवनच आहे. पिंडारी-काफनी सुदर दुंगा आणि नामीक ग्लोशिअर उत्तर प्रदेशाच्या अलमोडा जिल्ह्यात तर मिलम, रालम ग्लोशिअर पिंठोरी गड जिल्ह्यात येतात. बागेश्ववर हे गाव शरयू आणि गोमतीच्या सगमावर वसलेले आहे येथूनच नदाकोट (२०५८० फूट) मॅक टूली (२०४१२ फूट), ही हिमशिखरे दिसतात

"आम्ही सर्वजण फ्रेश होऊन गार्डनमध्ये जमलो. सध्याकाळची थड हवा अगाला झोंबत होती बगीच्यातले हिरवे गार मऊ शार गवत पायाला गुदगुल्या करीत होते. गुलाब, मोगरा, चमेली ही रगीबेरगी फुले पहाण्यात मी अगदी मुग्ध होऊन गेले इतक्यात माझं लक्ष एका छोट्या फुलाकडे गेल जणू काही ते फूल माझ्यकडेच टकमका पहात

होत. अशी लहान लहान किती तरी फुलें फुलपाखरासारखी छोटी पिवळ्या रंगाची, ही फुल, ह्या फुलावर डोळ्यासारखे दोन काळे ठिपके, त्या डोळ्याखाली अजून एक नाकासारखा छोटा काळा ठिपका व त्याच्या खाली एक तोंडासारखा मोठा काळा ठिपका मी तर त्या फुलाकडे पहातच राहिले कारण ती फुल तोंडासारखी दिसत होती. मला ती वनमानवासारखी भासली अशी फुले मी प्रथमच पाहत होते या फुलात मी थोडावेळ का होईना अगदी रममाण झाले. समीरच्या आवाजाने मी या फुलाच्या विश्वातून बाहेर आले समीरने आम्हांला काही सूचना केल्या आणि सागितले "रात्री तुम्हांला सर्वांना सॅक देण्यात येतील त्याच्या अगोदर तुम्ही बागेश्वर पाहू शकता पण आठ वाजता जेवायला हजर पाहिजे।" कॅम्पलीडर समीरची परवानगी घेऊन आम्ही बागेश्वर पाहण्यास निघालो

गोमती आणि शरयू या दोन नद्यांचा संगम आम्ही पाहिला. या नद्याच्या दगड गोटे किनारी बसून, थोडं पाण्यात खेळून नंतर आम्ही शकराच्या मदिरात गेलो. नदीच्या किनारी असलेले हे प्राचीन शिवमंदिर होय मदिरात शिरतानाच एक मोठी पितळेची घटा आहे मदिराच्या आत गाभाऱ्यात भव्य दिव्य असे शिवलिग आहे आमची पदयात्रा सुखरुप पार पाडण्यासाठी मी मनातल्या मनात शंकराची प्रार्थना केली. मदिरालगत पुरातन कलात्मक मूर्ती, ऐतिह्यसिक वस्तू, कोरीव शिल्प जतन करून ठेवल आहे मंदिरातच आम्हांला साडेसात वाजले. आठ वाजता आम्हांला हजर राहयचे होते आम्ही धावतच निघालो. आठ वाजता आम्हीं गेलो तर सर्व जण रेस्ट हाऊसच्या कॅन्टीनमध्ये जेवण्यासाठी बसले होते. आम्ही पण हात धुऊन जेवावयास बसलो. इथपासून "युवाशक्ती" तर्फे जेवण सुरू झाले जेवण उरकून आम्ही सॅकसाठी नबर लावला प्रत्येकाला एक सॅक देण्यात आली. देताना आमची सही घेतली गेली सॅक म्हणजे पाठीला अडकविण्यासाठी दफ्तरासारखी जाड कापडी पिशवी होय.

सॅक घेऊन आम्ही आमच्या रूममध्ये आलो. आता



ग्रंथ संग्रहालय
प्रत ६६३
२७३६८
२४।३।०४

आवश्यक त्या सामानानं सॅक भरावयाची होती मला तर सर्वच सामान आवश्यक वाटत होतं म्हणून मी भराभरा सामान भरले. तर काय सॅक एव्हढी फुगली की ती मला एकटीला उचलता येईना इतकी ती जड झाली. आमच्या ग्रूपमधली अर्चना आमच्यापेक्षा लहान परतु ती ट्रेकमध्ये अनुभवी व हुषारही होती. तिने आम्हा सर्वांना वेड्यात काढले

"एवढी जड बॅग पाठीवर टाकून तुम्हांला चढता तर जाऊ दे पण चालता तरी येईल का?" असे म्हणून ती थोडी रागावली पण तिनेच आम्हाला कोण कोणते सामान घ्यायचे व बॅग कशी भरायची ते प्रात्यक्षिक करून दाखविले मग मात्र मी सॅक व्यवस्थित भरली. सॅकच्या उजव्या बाजूच्या खणात टॉर्च, दोरी डायरी-पेन, सुईदोरा, वॉटर बॅग या वस्तू भरल्या तर डाव्या बाजूच्या खणात माझ्या सौंदर्य प्रसाधनाच्या वस्तू व औषधे म्हणजे अमृतांजन, आयोडेक्स, बॅन्डेड, पावडर, व्हॅसलिन तसेच सर्व व्याधीवरील गोळ्या या वस्तू भरल्या म्हणजे जवळजवळ कोंबल्याच आणि सॅकच्या मधल्या मोठ्या खणात टी शर्ट, जीन-पॅन्ट, दोन स्वेटर, हातमोजे माकडटोपी हे ऊबदार कपडे तसेच पायमोज्याचे दोन तीन जोड, रेनकोट, खाण्याच्या काही वस्तू चॉकलेट, गोळ्या, बिस्किटे, ड्रायफ्रूटस इत्यादि सामान भरले. बूट पायमोज्याचा एक जोड, ट्रेकसूट हे सकाळी घालून जाण्यास बाजूला काढून ठेवले. उरलेलं सर्व सामान आणलेल्या सूटकेसमध्ये ठेवून दिले सूटकेसला कुलूप लावलं कारण ती सूटकेस येथेच म्हणजे बागेश्वरला ठेवायची होती.

एकमेकींना सामान दाखवितच आम्ही आमच पॅकिंग एकदाचं पूर्ण केल मग मी सॅक पाठीला अडकविण्याचा व पाठीवर सॅक घेऊन चालण्याचा जरा सराव करू लागले रूम मध्येच इकडून तिकडे व तिकडून इकडे मी येरझाऱ्या मारीत होते. माझ्याकडे पाहून मला सर्वजणी हसताहेत याचं मला भानच नव्हत अखेर उद्याच्या सुदर दिवसाची वाट पाहत रात्रीच्या निद्रादेवीने कधी मला हाक मारली ते कळलं नाही.

# वीस मे त्र्याण्णव

*मला गाढ झोप लागली*
*स्वप्न पडलं. माझं सर्वांग,*
*ठणकत आहे आणि मी माझ्या*
*हातापायाना आयोडेक्स लावित आहे.*

आज पहाटे आम्ही लवकरच उठलो सर्व विधी आटपून अगात ट्रेक सूट घालून, पायात् हटर बूट चढवून सॅक पाठीवर अडकविली.

बागेश्वरला ठीक आठ वाजता आम्ही बसमध्ये बसलो बागेश्वर ते सोंग हा दोन तासांचा प्रवास आहे. बरीच वळण घेत घेत बस चालली होती जेमतेम ऐकरी वाहतूक होईल असा अरूद रस्ता. समोरून वहान आले तर

परतु मुंबई पुण्यासारखे हुज्जत न घालता सुरक्षित जागेपर्यंत कुणी तरी एक जण मागे जाऊन थाबतो आणि पास देतो किती हा समजूतदारपणा आहे, हे प्रकर्षाने जाणवल सोंग साधारण ४० कि मि वर असणार शेवटच रहदारीन जोडलेल गाव असाव तेथे आम्ही उतरलो

साईने निगमच्या गाईडला "लोहारखेत के लिए किधर जाना है?" फसफसणाऱ्या थडपेयासारखे उत्साहात विचारले

"शाब, वो उपर लोहारखेत है। बस वहाँ आज रुकना है" ८० अंशाचा हाताचा कोन करून त्याने आम्हाला दिशा

दाखविली तेव्हा गॅस निघून गेलेल्या सोडावॉटरसारखे आमचे चेहरे झाले होते सुरुवातीलाच धक्का बसला होता परतु चेहऱ्यावर न दाखवता आम्ही पुढे सरकलो

आता आमच्या खऱ्या पदयात्रेला सुरुवात झाली मी खालून वर नजर टाकली आणि माझी पाचावर धारण बसली अखेर पहिल्या पायरीला नमस्कार करुन व मनाचा हिय्या करुन मी चढायला सुरुवात केली.

आमच्या मागून एक पहाडी मनुष्य येत होता त्याच्या पाठीवर बरच ओझ म्हणजे तीन चार जणाच्या सॅक होत्या. याना येथे पोर्टर असे म्हणतात हे पोर्टर १ कि मि चे सहा किंवा सात रुपये घेतात

चढता चढता एके ठिकाणी मी दम घेण्यासाठी एका दगडावर हात टेकून बसण्याचा प्रयत्न केला तितक्यात माझ्या हाताला काहीस तरी टोचले दगडावरच्या वनस्पतीचा एक छोटा काटा माझ्या हातात रुतला होता क्षणात माझा हात लगेच सुजलाही

मला तर काय कराव काही कळेना, भीती आणि वेदना या दोन्हीमुळे माझी अवस्था विचित्रच झाली तेव्हढात मागून, तो पहाडी मनुष्य माझ्याजवळ येऊन ठेपला त्याने माझी अवस्था पाहिली त्याने लगेच त्याच्या जवळच्या छोट्या पिनेने माझ्या हातातील काटा काढला, व हातावर थड पाणी ओतल थोड्या वेळाने माझ्या हाताची वेदना थाबली व सूज पण ओसरु लागली मी त्या पहाडी मनुष्याला शुक्रीया बोलून त्याच नाव विचारलं

"जी, मेरा नाम 'पुष्कर' है।"

गोरा पान उच सडपातळ असा हा पुष्कर मला पुढे रस्त्यानी त्याच्या पहाडी जीवनाबद्दल सागत होता

"यही सिझनमें हम कुछ कमाते हैं। नहीं तो बस हमारी खेती रहती है। थडीमे जब बर्फ गिरता है, तभी हम घरमे बैठके लोकरका स्वेटर वगैरह बनाते है।"

"आप कभी शहर गये है?" मी विचारले



ढगाचा व हिमशिखराचा लपंडाव



हिमालयाची विविधरूप

तर तो हसून म्हणाला

"हाँ शहर तो हम गये हैं। पर हमें शहर से हमारा ये पहाडी जीवन ही अच्छा लगता है। शहर में तो बहुत सारी गाडियाँ देखते ही हम हडबडा जाते है। वहाँ तो हमें रस्ते मे चलना भी नहीं आता। अच्छा जी मै आगे चलता हूँ। अब इधर-उधर हाथ मत लगाना। यहाँ की वनस्पती अलग अलग तरह की है। और देखिये यहाँ एक ऐसा फल है जो दिखने में बहुतही लुभावना होता है। वो मत खाईये उसे पूरे दात गिर जाते हैं। त्याच बोलण ऐकून मी शहारले. परतु तो मात्र भरभर पुढे निधून गेला.

मी आपली हळू-हळू माझ्या पाठीवरची सॅक साभाळत चालले होते पायानाही अजून बुटाची सवय झाली नव्हती हा चढ चढताना मात्र माझी दमछाक झाली अनुभव काही नाही ट्रेकिंगची पण पाहिलीच वेळ अखेर छातीवरचा चढ चढून साधारण ४ तासानी आम्ही सगळे लोहारखेतला पोहोचलो वरून सॉगकडे विजयी वीराप्रमाणे पाहिले सारा थकवा निधून गेला होता

लोहारखेत स स उची ५७५० फुट, ५ कि मि. अतर आम्ही चढलो होतो आजचा मुक्काम येथेच होता

कॅम्पला गेल्या गेल्या आम्हाला सर्वांना सरबत दिल गेल. सरबताचे घोट घेत असतानाच माझे अतरग मला विचारीत होते

'खरच आपण एव्हढ्या वर चढू शकू का? झिरो पॉईट पर्यंत पोहचू का? माझ्या मनात हे आशा-निराशेचे खेळ चालू असतानाच निसर्गात ऊन पावसाचे खेळ चालू होते.

परतु आमचा ग्रुपलीडर म्हणजे साईने मात्र धीर दिला "ही तर तुमची ट्रायल होती आणि पहिली ट्रायलच जरा कठीण असते" त्यामुळे माझ्या मनात जरा आत्मविश्वास निर्माण झाला मुख्य म्हणजे माझ्या मित्र-मैत्रिणींच्या सदिच्छा माझ्या मागे होत्याच त्यामुळे माझ्या मनातील भीती नाहीशी

होऊन तिथे एकच ध्येय निर्माण झाले काही झाले तरी शेवटपर्यंत जायचे पिंडारी करायचे आणि झिरो पॉईंट गाठायचाच

कुमाऊ मडल वि नि चे कॅम्प म्हणजे एक लाकडी घर त्यात स्त्री-वर्गासाठी एक मोठी खोली व पुरुष वर्गासाठी एक मोठी खोली बाहेर तबू पण, बाधलेले असतात पण तबूत काही आम्ही कोणीच झोपायला गेलो नाही कारण त्या लाकडी घरातच आम्ही थडीने थरथरायचो

दुपारी गरम गरम जेवण घेतल. जेवण तयार करण्यासाठी तेथील पहाडी रहिवासी असतात. बुफे पद्धतीप्रमाणे जेवण आपण स्वत पाहिजे तेव्हढ ताटात वाढून घ्यायच.

आम्ही एका झाडाखाली जेवत असतानाच आमच्या समोरच्या दगडावर एक कावळा येऊन बसला. त्याचा आवाज 'काव' 'काव'च पण मुबईच्या कावळ्यापेक्षा फारच भारदस्त वाटला दुसर विशेष म्हणजे हा कावळा पूर्ण काळा कुळकुळीत परतु त्या काळ्या रगाला एक प्रकारची तकाकी होती, चमक होती.

आम्ही त्याला खाण्यास एक चपातीचा तुकडा टाकला पण तो ते खाण नाकारून उच उडून गेला एव्हढ्या उचावर मला हा एकच कावळा दिसला

जेवण झाल्यावर वाटल आता मस्त ताणून देऊया आणि काय मी, मगला, मीना, मयुरी आम्ही खरोखर झोपून घेतल आमच्या ग्रुपलीडरची शिटी ऐकून आम्हाला अखेर उठावच लागल

"असे आळशासारखे बसला काय? असे झोपून राहिलात तर उद्या तुम्हाला चालायला होणार नाही तेव्हा फक्त चालत रहा किंवा एखादा मैदानी खेळ खेळा" साई जीव तोडून सागत होता मग मात्र आम्ही आळस झटकला.

आम्ही आमच्या कॅम्पच्या जवळच असलेल्या एका

टेकडीवर गेला( टेकडी आम्ही अगदी सहजपणे चढलो टेकडीवरुन फारच सुदर दृश्य दिसत होते. खाली सोगचा रस्ता व त्या रस्त्यावरुन जाणाऱ्या गाड्या अगदी खेळातल्याहून्ही लहान वाटत होत्या

मुख्य म्हणजे मला घाबरविणारा सोग ते लोहारखेत हा खडकाळ रस्ता चढून वर येताना मला किती त्रास
झाला पण हा बेटा तिथेच राहिला मी मात्र वर आणि म्हणून मी त्याच्याकडे विजयी मुद्रेने पाहत होते या निसर्गाने क्षणात किती बदल केला होता माझ्यात !

टेकडीवरुन आम्ही रमत गमतच कॅम्पवर पोहोचलो तेथे चहा आमची वाटच पहात होता चहा झाल्यावर सर्वांनी रुमाल-पाणी खेळायच ठरवल

खेळ अगदी रगात आला होता मगला खेळत होती मी आपली दूर एका बाजूला बसून खेळ पाहत होते थोड्या वेळाने देशमुख मॅडम मला म्हणाल्या "तू काय येथे बसली आहेस तू पण जा खेळायला!" मी खेळात सामील होण्यासाठी जरा पुढे गेले तर खेळातले सर्व जण माझ्या भोवती गोळा झाले

"नाही, नाही तुम्हाला राज्य घ्यायलाच पाहिजे. तुम्ही आऊट झाला आहात" सर्वजण ओरडू लागले

'मी तर खेळत नव्हतेआणि माझ्यावर राज्य कस आल?' क्षणात काय झाल ते कळलच नाही शेवटी मी राज्य घेतलच हा सगळा प्रकार माझ्या नतर लक्षात आला कारण आऊट झाली होती ती मगला मगला सर्वांना गुगारा देऊन एका बाजूला पळाली मी तेथे आल्यावर सर्वांनी मलाच पकडल कारण अजूनही आमच्या दोघींना पाहून सर्वजण फसत होते मला मगला तर मगलाला सुरेखा समजत होते

रुमाल-पाणी नतर, आईच पत्र हरवल खेळत असतानाच गरम सूपची ऑर्डर आली सूप घेतल्यानतर अर्ध्या तासानीच आमच जेवण उरकल सर्व कॅम्पला सात साडेसात पर्यंत जेवण आटपलच पाहिजे अशी शिस्त होती.

रात्री ९ वाजता आम्ही कॅम्प फायरसाठी बाहेर जमलो साईने आम्हाला पुढच्या कार्यक्रमाविषयी काही सूचना दिल्या. तसच तो म्हणाला.

"चढताना कधीही बसायच नाही त्यामुळे उलट जास्त त्रास होतो व चालताना पण दम लागतो

त्यावेळी आमच्या ग्रुपमधल्या अभ्यकर काकानी त्याचा एक बर्फातला भयकर अनुभव सागितला, तो असा-

"मी, माझे कुटुब आणि माझे काही मित्र आम्ही खाजगीरीत्या गगोत्रीला गेलो होतो जेव्हा आम्हाला ग्लेशियर लागले, तेव्हा आम्ही रस्ता शोधत चाललो होतो खर म्हणजे आमचा रस्ता चुकलाच होता आमच्यापुढे काही साधू पालखी घेऊन चालले होते. त्याच्या मागोमाग आम्ही चाललो होतो पण नतर ती पालखी फारच पुढे गेली. गुढघ्याएव्हढ्या बर्फात जलद चालण कठीण होत होत. त्यात अधाराच साम्राज्य पसरलेल. आम्ही एके ठिकाणी बर्फातच पुढे काय करावे या विचारात उभे राहिलो मागे पुढे काहीच दिसत नव्हत आणि बर्फाने तर पाय थड पडले होते. शेवटी मी टॉर्च काढली, ती टॉर्च इकडे तिकडे मारू लागलो या युक्तीचा मला उपयोग झाला. कारण दुसरीकडून मला टॉर्चचा झोत दिसला. मग मी टॉर्च दोन वेळा उघडझाप करून इशारा दिला व मदतीचा आवाज दिला तेव्हा दुसरीकडून पण तसाच इशारा मिळाला आहे. त्या स्थितीत आम्ही तेथेच उभे राहिलो थोड्यावेळाने खरच तिथे एक साधू आला त्याने आम्हाला रस्ता दाखवत दाखवत एका देवळाजवळ नेल आम्हाला अगदी परमेश्वर भेटल्यासारख झाल परतु या परमेश्वरामुळेच आमची अवस्था आणखीणच बिकट झाली कारण त्या रात्री आम्ही त्या देवळाच्या बाहेर मुक्काम केलेला होता सकाळी उठून पाहतो तर काय त्या देवळात चोरी झाली होती मग काय, ज्या साधून आम्हाला आसरा दिलेला तो आमच्याकडे सशयाने न पाहील तर नवलच! अशा कठिण प्रसगातून

आमची ती गंगोत्री यात्रा पूर्ण झाली. पण त्यानतर मी मात्र ठरवल की, आता याच्यापुढे अस कधीही खाजगीरित्या जायच नाही गेलोच तर 'युवाशक्ती' सारख्या एखाद्या सस्थेमधून जायचे"

हा अनुभव ऐकत असताना गरम बोर्नव्हिटा आला हा भयकर अनुभव व गरम बोर्नव्हिटा याच्यामुळे थडी सुद्धा पळाली असावी कारण बाहेर इतकी थडी असूनही आता कोणालाच जाणवत नव्हती अखेर साईने सर्वांना झोपण्याचा सल्ला दिला

"उद्या पहाटे लवकर निघायचे आहे तेव्हा लवकर उठून तयार व्हा." अस बजावल.

रात्री आम्हा सर्वांना झोपण्यासाठी स्लिपिंग बॅगा दिल्या या बॅगेत अथरूण व पाघरूण ही दोन्ही सोय होती पण या स्लिपिंग बॅगा कशा हाताळायच्या हे माहिती नसल्यामुळ आमची फारच फजिती झाली.

कोणाला बॅगेत शिरल्यावर बसता येईना तर कोणाला झोपता येईना काहीजणींनी तर बॅग उलटीच घेतलेली मी तर किती वेळ ती स्लिपिंग बॅग वर खालीच करत होते आपल्या अर्चना, मयुरी होत्याच त्यानी आम्हाला त्या बॅगेत कसे शिरायचे व नतर झोपल्यावर त्या बागेची चैन कशी लावायची याच प्रात्यक्षिक करून दाखविल फार प्रयासाने आम्ही त्या बॅगेत विसावलो

त्या रात्री आम्ही सर्वजणी पोटभर हसलो. मग मात्र आम्हाला त्या स्लिपिंग बॅगची सवय पडून गेली

माझ्या अवाढव्य घरी आणि ऐसपेस जागेत मला झोपायची सवय पण येथे या अडचणीच्या जागी व या स्लिपिंग बॅगेत माझा कधी डोळा लागला ते कळलच नाही.

# एकवीस मे ज्याण्णव

पहाटे पाचलाच सर्वजण उठलो तेथे पहाटे ४ लाच इतक फटफटत म्हणजे उजाडते की जणूकाही सात-आठ वाजले आहेत लोहारखेतवरून आम्हाला ढाकुरी मार्गे खाली जायचे होते हे अतर जवळ-जवळ १० ते ११ कि मी आहे

ढाकुरीचा १० कि. मी रस्ता सपूर्ण चढ तर शेवटचा १ कि मी रस्ता उताराचा आहे आज मात्र मी, आणि मगला सर्वांच्या पुढे होतो. परतु आमच्याहीपुढे सर्वांत छोटा शौनक व सर्वांत मोठे अभ्यकर काका होते हे दोघेही नेहमी सर्वांच्या पुढेच असत

आता मात्र मी चढताना अजिबात बसत नव्हते त्यामुळे दमही मला कमी लागत होता विश्रातीसाठी दोन मिनिटे उभी राहायची की परत चालायला लागायची

आम्ही फारच पुढे आलो होतो तेव्हढ्यात आम्हाला खालून दीर्घ शिटीचा आवाज ऐकू आला दीर्घ शिटी दिली की पुढे जाणाऱ्यानी थांबायचे अशी आम्हाला सूचना दिली गेली होती आम्ही होतो तिथेच थाबलो व आमच्यापुढे असणाऱ्या अभ्यंकर काकाना पण थाबण्याचा आवाज दिला कारण आमच्या मागचे अजून फारच खाली राहिले होते ते सर्वजण येईस्तोवर आम्ही निसर्ग-चित्र पाहण्यात रमून गेलो

एका बाजूस मोठे काळे पहाड, दुसऱ्या बाजूस खोल दरी, नजर भिडणार नाही अशी पसरलेली समोर पर्वत शिखरे,

अवती भवती उच उच वृक्ष कमानी करुन जणू आमच्या स्वागतासाठी सज्ज होते. हे सर्व चित्र पाहून माझे देहभान हरपले पण माझे डोळे मात्र फिरावयास लागले

मी ऑफिसच्या सातव्या मजल्यावरुन किंवा आमच्या गच्चीवरुन जरी पाहण्याचा प्रयत्न केला तर मला गरगरल्यासारख होतं. मग आता इतक्या उचावरुन जर मी हे दृश्य पाहिल तर माझे डोळे फिरल्याशिवाय राहतील का?

एक वैशिष्ट्य म्हणजे सह्याद्रीच्या पर्वतरागा सरळ रेषेत आहेत आणि हिमायलाच्या पर्वतरागा एकामागे एक अशा आहेत. जणु लाबून ते पर्वत एकामागे एक लपल्यासारखे दिसत होते

त्याच वेळी खाली राहिलेली मडळी आमच्या दिशेने चालत येत असताना दिसली. ग्रुपलीडरन शिटी वाजवून आम्हाला पुढे जाण्यास हरकत नसल्याचे सूचित केले.

खाली टाकलेली घोपटी पाठीवर घेतली आणि लागलो परत चढ चढायला ट्रेकमध्ये शिटी टॉर्च याना फार महत्त्व आहे. जर कोणी व्यक्ती रस्ता चुकली किंवा कोणाला हाक मारायची असेल तर या दोन्ही गोष्टींचा चागलाच उपयोग होतो

आमच्यामध्ये अर्चना शिटी छान वाजवायची आम्ही तिच्याकडून शिटी कशी वाजवायची हे शिकण्याचा बराच प्रयत्न केला परतु आम्हाला काही ते जमले नाही.

माझ्या तर तोंडातून साधी हवा पण बाहेर पडायची नाही, तर शिटी काय वाजणार कपाळ!

रस्त्यान चालता चालता आमच्या या शिटी प्रकरणात एक मोठी गमत आम्हाला अनुभवायला मिळाली अर्चना जेव्हा शिटी वाजवित होती तेव्हा तिच्या शिटीचा आवाज ऐकून एका पक्षान पण तशीच शिटी दिली.

तिकडे आम्ही पक्षाना शोधण्याचा फारच प्रयत्न केला पण एक सुद्धा पक्षी दिसला नाही. कारण तेथील उच उच

झाडी त्या झाडात ते पक्षी कोठे दडून बसायचे ते दिसायचे नाही पक्षाच्या आवाजाच्या दिशेने पाहिले की तेथे दाट हिरवी वृक्षराजी थरथरताना दिसायची.

तेथील एका पक्षाची आम्हाला शीळ ऐकू आली

"कूकूऽऽऽ कूक, कूकूऽऽऽ कूक" अर्चनाने मग हुबेहुब अशीच शिटी वाजविली तर तिकडून त्या पक्षाने पण तसाच आवाज दिला

दुसऱ्या एका पक्षाची शिटी होती

"कूऽऽ हूऽऽ क, कूऽऽ हूऽऽ क"

अर्चनाने अशीच शिटी वाजविली तर तिच्या या शिटीला पण त्या पक्षाने प्रतिसाद दिला

मग आम्हाला रस्त्यानी चालताना त्या पक्षाचाच म्हणजे त्याच्या त्या गोड शिटीचा नाद लागला

चालता चालता सर्व जणी एक एक करून पुढे निघून गेल्या. मी मगलासाठी थाबले आमच्या दोघीची गाडी जरा रखडलीच होती मध्ये कुठे तरी थाबत सॅक मधून बिस्किट, चॉकलेट काहीतरी खाऊ काढून तो तोंडात टाकत, इलेक्ट्रॉलचे पाणी पीत पीत चाललो होतो तसे पाण्याचे मध्ये बरेच झरे लागले हे पाणी अगदी थडगार लागायचे

या झऱ्याचे पाणी जरा तोंडावर मारले आणि ओठ नुसते ओले केले तरी चालायला हुशारी वाटायची

चढ चढतोय चढतोय तरी चढ सपायच नावच दिसत नव्हत.-त्यात भरीस भर म्हणजे आमच्या सर्वांच्या तब्बेती बिघडण्यास सुरुवात झाली पण मगला माझ्याबरोबर असल्यामुळे मला काही पुढे जास्त त्रास झाला नाही. कारण ती वेळेवर मला चार-पाच प्रकारच्या गोळ्या द्यायची आणि मी त्या गोळ्याची काही एक चौकशी न करता त्या सर्व गोळ्या एकसाथ पोटात ढकलायची

पायामागे पाय टाकत चालत असतानाच पुढे एके ठिकाणी रस्ता नव्हता हे लक्षात आले कारण आम्ही

उभे होतो त्याच्या समोरच्या डोंगरावरून तोच रस्ता पुढे गेला होता या दोघामधला जोडलेला लाकडी पूल मात्र तुटला होता.

आमच्यापुढे गेलेले सतोष, राजेन्द्र, आनद, प्रसाद, शलाका ही सर्वजण मार्गदर्शनासाठी थाबली होती. सतोष खाली उभा होता त्याने आम्हाला उतरत्या खडकावरून घसरत येण्यास सागितल मी विचार करीत उभी होते. समोर शलाका ओरडत होती

"आँटी लवकर या घसरुन, मला या स्पॉटचा फोटो काढायचा आहे?" मी मनात म्हटल 'इथ आता माझ्या पोटात गोळा उठलाय आणि हिला फोटोच सुचतय.'

अखेर मी डोळे गच्च मिटून घेतले आणि पाय खाली सोडून स्वत:ला झोकून दिले मनात विचार आला. 'आता काय व्हायचे ते होऊ दे कुठे आपटतेय आता कोणास ठाऊक?'

पण जेव्हा डोळे उघडले, पहाते तर काय, मी अगदी व्यवस्थित होते कारण खाली सतोषन मला सावरले होते तो बिचारा त्याचसाठी खाली उभा होता

"घाबरु नको, बिनधास्त खाली ये." मी मगलाला आता हुशारी करून सागत होते.

त्या दिवशी मात्र आमची सर्वांची फार दिवसाची घसरगुडीची हौस पूर्ण झाली जस जसे वर चढत होतो तसतशी तहान भूक लागत होती बरीच वळण ओलाडून दाट जगलातून मार्ग काढीत काढीत आम्ही ११ कि मी. चा रस्ता मागे टाकला आम्ही एका ध्वजाजवळ पोहचलो, ते एक देऊळ होते शकराचे कारण तेथे त्रिशूळ होता. दोन उताराच्यामध्ये असलेले हे देऊळ दोन डोगराचे उतार ज्या ठिकाणी मिळतात त्याच ठिकाणी हे मदिर आहे

वाटेत अस वाटत होत की सॅक, कॅमेरा, सारे फेकून द्यावे. सरळ आडवे झोपावे पण. .

धाकुरी कॅम्प खाली १ कि. मी. वर दिसत होता

समोरील दृश्य शरीरातील एक एक थकण्याचे कण वितळवीत होते. नदाकोट आणि मॅकटुली हिमशिखरे आकाशाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसत होती

कुठे कुठे ढगानी झिम्मा फेर धरला होता. ढगानी भरलेल्या आभाळाचा भेद करून सूर्य किरणाचा फवारा समोरच्या टेकडीचा काही भाग उजळवीत होता ढगाच्या छटा मॅचिंग सेंटर मधील शेडप्रमाणे दिसत होत्या चढ आल्यानतर नैना म्हणायची,

"माझा दुश्मन आला बाबा!"

मलाही चढ चढायला अवघडच वाटायच उतार आल्याबरोबर आम्ही धावतच सुटलो हा १ कि मी. उतार उतरत असतानाच वाटेत मिस कूलर या इग्लडच्या ट्रेकर भेटल्या त्या गेले ४/५ महिने कुमाऊ रिजन ट्रेकचा अभ्यास करीत आहेत

एक परदेशी मुलगी आपल्या देशात इतके दिवस राहते. अभ्यास करते, खरच त्याच्याबद्दल खूप अभिमान वाटला. त्या मिस केलरनी मला व मगलाला पाहून आम्ही दोघी बहिणी असल्याच अचूक ओळखल

मला पानाचा जोरदार आवाज ऐकू आला म्हणून मी मगे वळून पाहिल तर मगला खाली घसरत येत होती मला वाटलृ हिची अजून घसरगुडीची हौस फिटली नाही वाटत. पण ती खाली आल्यावर कळलृ की ती जवळच्या रस्त्याने खाली उतरत असताना तिचा पाय घसरला व सर्ऽऽ दिशी झाडाच्या पडलेल्या पानावरुन ती खाली आली नशिब कुठ काही खरचटल नाही.

अखेर एकदाचे आम्ही कसेबसे धाकुरीला पोहचलो धाकुरी कॅम्प स स उची ८८०० फुट आहे

धाकुरीला आमचे कॅम्पलीडर श्री खैरनार काका हे होते हे काका वयाने वृद्ध पण मनाने चीरतरुण भासत होते. त्याचा आवाजही कडक होता त्याना पाहून

थोडावेळ का होईना मला माझ्या सासऱ्याची म्हणजे दादाची आठवण झाली वयाची साठी उलटून गेलेली पण त्याच वागण बोलण फारच कडक तसेच तब्येतही इतकी ठणठणीत की मला अजूनही ते कधी डॉक्टरकडे गेल्याचे आठवत नाही या खैरनार काकानी आमच सर्वांच स्वागत केल

धाकुरीला गेल्या गेल्या सर्वांना सरबत मिळाल परतु हे सरबत कित्येक जणाना पचलेच नाही येथे सगळेजण गळून गेले होते कोणाला जेवण्याची इच्छा नव्हती. मगलाला पण उलटी झाली, त्यामुळे ती जेवत नव्हती परतु मी तिला बळेच जेवू घातले कारण जेवल्याशिवाय चालण अशक्य होत आणि आम्हाला अजून पुढे 'खाती' मुक्कामी जायच होत.

थकून भागून उपयोग नव्हता पायाना चालण्यासाठी तयार करायच होत खैरनार काकानी पण सागितल.

"येथे कोणी राहायच नाही. तुम्हाला अधार पडायच्या आत खातीला पोहचल पाहिजे. कारण दुपारनतर केव्हाही वादळी वातावरण होणार होते तेव्हा आता लवकर निघा"

खर तर सर्वांनाच अक्षरश· कटाळा आला होता एवढे ११ कि. मी तुडवून आता परत ८ कि मी. दूर जायचे आहे प्रथम ४ कि. मी पूर्ण उताराचा रस्ता आणि नतरचे ४ कि. मी. चढ आहे.

आम्ही जेव्हा कॅम्पवर असायचो तेव्हा फारच थडी वाजायची तेव्हा सर्वांगावर स्वेटर, कानटोपी, हातमोजे हे ऊबदार कपडे चढवावे लागायचे परतु जेव्हा आम्ही चालायला सुरुवात करायचो तेव्हा थडी धूम पळायची. कारण चालताना इतक गरम व्हायच की आम्हाला सर्व गरम कपडे काढून ठेवावे लागायचे

खातीला निघताना रस्त्यात मला तेथील एका झाडाची जाड अशी छान काठी सापडली ती काठी घेऊन चालताना मला त्या काठीचा बराच आधार वाटला.

शेवटपर्यंत "जेथे जाई तेथे काठी माझी सांगाती" होती त्या काठीचा पुढे मला बर्फात फारच उपयोग झाला कारण पाऊल पुढे टाकायला बर्फ कडक आहे भुस्सा आहे ते काठी आपटून बरोबर कळायच

खालीला जाताना पहिला उतार लागल्यान मी भराभर पुढे उतरत गेले कारण उताराचा रस्ता म्हणजे माझ्या आवडीचा रस्ता तसा हा उतार रस्ता काही जणाना उलट चढापेक्षा अधिक कठिण वाटतो कोणाला पायात गोळा येण्याची, पाय सटकण्याची, खाली गडगडत जाण्याची भीती या अशा रस्त्यावर वाटते

मी, सतोष, अमृत, प्रसाद, शलाका आम्ही पाचजण फारच पुढे आलो होतो. रस्त्यात आम्हाला 'पिंडारी' करून आलेले युवक, युवती व काही वृद्ध मडळी सुद्धा भेटत ते आम्हाला हसून "बेस्ट ऑफ लक", "वेलकम" अशा शुभेच्छा देऊन उत्साहित करून जात

रस्त्यान चालताना आमच्या पाचजणात ऐकमेकाचा परिचय चालला होता "तुम्ही पुण्याला कुठे नोकरी करता?" प्रसादच्या देहाकडे बघून मी त्याला प्रश्न विचारला

माझा प्रश्न ऐकून तो अवाक्च झाला तो म्हणाला

"मी आता कुठे दहावीची परीक्षा दिली आहे. आता जूनमध्ये निकाल लागेल"

त्याच उत्तर ऐकून मलाच माझी लाज वाटली मग मात्र मी असे प्रश्न कोणाला विचारले नाहीत न जाणो एखादा बारीक मापूस नोकरी करत असणार आणि मी त्याला विचारणार तुम्ही कितवीला आहात

तशी आमच्या ग्रूपमध्ये एक सुरेखा चिचणकर नावाची पुण्यातली मुलगी होती तिला पाहिल्यावर वाटेल की अजून ही शाळेतच जात असेल किंवा हिने नुकतच कॉलेज जॉईन केल असेल परतु हीच मुलगी डबल ग्रॅजुएट आणि एका मोठ्या कपनीत इजीनियर आहे हे ऐकल्यावर कोणाला खर वाटणार नाही.

सतोष, शलाका, अमृत ही मुले पण दहावी-बारावीची होती अखेर मजल दरमजल करत आम्ही खाती या गावी पोहचलो खाती पाटी वाचून आम्हाला खूप आनद झाला

चला। आलो एकदाचे!

परतु वाटेत आम्हाला निगमचा गाईड भेटला तो म्हणाला, "जरासाही रह गया है। केवल पौना कि मी सभलके चलना।" असा राग आला त्याचा! वाटल त्याच्या समोरच सामानाची आदळ आपट करावी पण हे सार मनातच कारण आमचा "कुमाऊ मडळ" चा कॅम्प खाती या गावापासून फार उच होता

तो उच चढ चढताना माझी तर कबर धरली पण कबर धरुन उपयोग नव्हता कबर बाधून अखेर शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहचलो. कॅम्पवर पोहचल्यावर आम्ही सर्वांनी एकदाचा उसासा टाकला.

खाती स स उची ७२०० फुट, येथून सुदरढुगा ग्लेशियरकडे डाव्या हाताने रस्ता जातो. सुदरढुगा स स. उची ११४१८ फुट ते ही अत्यत सुदर ग्लेशियर आहे असे ऐकले

आजच्या या कॅम्पवर मी नेहमीपेक्षा सर्वांत प्रथम पोहचले जवळ जवळ अर्धा तास मी विश्राती घेतली हळूहळू अधार पडायला लागला

मला मगलाची काळजी वाटू लागली. कारण तिची तब्बेत पण बरी नव्हती अखेर अर्चना आल्यावर मी व अर्चना परत खाली निघालो लाबूनच मला मगला व मीना येताना दिसल्या मी व अर्चनान मगलाची व मीनाची सॅक काढून घेतली व त्याच्याबरोबर परत वर चढ चढू लागलो मगला सागत होती

"रस्त्यात मीनाला चक्कर आली म्हणून आम्ही थोडावेळ थाबून राहिलो. त्यामुळेच उशीर झाला"

बाहेर फारच अधार पडला होता आमच्या बॅचचे

बरेचजण अजून आले नव्हते अखेर खातीचा कॅम्पालीडर टॉर्च घेऊन त्याना सर्वांना आणण्यास निघाला.

खातीला आल्यावर सर्वजण थकले होते रात्री जेवण झाल्यावर सगळे चिडीचूप झाले. आम्ही सारे इतके थकून गेलो होतो की कॅम्पफायर करायच विसरुन गेलो भीती होती तोंडान गाण निघण्याऐवजी कव्हणच आल तर!

रोज रात्री झोपताना वाटायच. उद्या आपल्याला चालता येईल का? कारण पायाची अवस्था फारच बिकट झालेली.

शहरात आपण एका स्टॉपसाठी पण बसच्या मागे धावतो आणि आता मात्र येथे पायाच्या मागे लागलो आहोत परतु येथील हवेचा परिणाम म्हणा किंवा निसर्गाची किमया म्हणा रात्री किती जरी थकलो तरी पहाटे उठल्यावर पायात परत बळ यायच आघोळ नसली तरी प्रसन्न वाटायचे

त्या रात्री आम्ही खूप थकलो असल्यामुळे ताबडतोब झोपेच्या अधीन झालो.

□ ■ □ ■

# बावीस मे ब्याण्णव

खातीला पहाटे उठून नाष्टा केला गरम चहा घेतला नाष्ट्याला बटाट्याची भाजी व पुरी होती बटाटा बहुतेक जास्त पिकत असावा. जेवणात जास्त करून बटाटा असायचाच कधीतरी सोयाबिन, फरसबी, मसूर याची भाजी असायची जेथे मुक्काम असेल त्या कॅम्पवर काही तरी गोड म्हणजे खीर, गुलाबजाम, शिरा असे पदार्थ असायचे.

आम्हाला आता द्वालीला निघायच होत पायाना जरा पावडर लावून पायात बूट चढवून चालायला आमची स्वारी तयार झाली

खाती ते द्वाली हे ११ कि मी च अतर आहे या रस्त्याला मात्र कुठे जास्त चढ किंवा जास्त उतार नाही हा रस्ता अगदी सरळ आहे.

रस्ता आणि पाय याचे जणू काही मेतकूट जमल होत. कारण पाय काही थाबत नव्हते आणि रस्ता काही सपत नव्हता

पुढे रस्त्यात आम्हाला हिमनदी म्हणजे पिंडारी नदी लागली खाली खोलवर नदी वेगाने वाहत होती या नदीवरुन पलीकडे जाण्यास आम्हाला मध्ये मध्ये लाकडी पूल लागायचे

या एका लाकडी पुलावरच माझे डोळे चमकले ज्याच्या दर्शनासाठी आम्ही उत्सुक होतो ते हिमशिखर आता जवळ

स्पष्टपणे दिसत होते सूर्य किरणानी ते चमकत होते. जणु आम्हाला जवळ बोलावीत होत

त्या हिमालयाच्या दर्शनान अगात एक प्रकारच चैतन्य निर्माण झाल मी आपली मनातल्या मनातच बोलले

'या हिमालयाच्या दर्शनान शरीरात एव्हढा फरक झाला अजून तर त्याच्या जवळ जाऊन त्याच्या माडीवर डोक ठेवायच आहे त्याच्या अगाखाद्यावर खेळावयाच आहे तेव्हा तर मी वेडीच होवून जाईन'

समोर खुणवत असलेला पाढरा शुभ्र हिमालय एका बाजूस गर्द हिरवी झाडी. दुसऱ्या बाजूला उचावरून कोसळणाऱ्या जलधारा खालून वेगान वाहणारी हिमनदी. खरच हे देवान रेखाटलेल निसर्ग चित्र किती बोलक आहे

हे निसर्ग चित्र काही चित्राप्रमाण मुक नाही तर त्याला निसर्ग सगीतानच एक प्रकारचा जिवतपणा आणला आहे देवानच दिलेले हे निसर्गसगीत म्हणजे वाऱ्याच घोंघावण, नदीचा प्रचड खळखळाट, झाडाच्या पानाची सळसळ, पक्ष्याची किलबिल आणि वरून कोसळणाऱ्या जलधाराच्या उडणाऱ्या फवाऱ्याचा सगीतमय नाच या निसर्गापुढ तर, मी आणि माझे शब्द मुके झाले आहेत

लोक गाडीन कितीतरी निसर्गस्थळ पाहण्यास जातात पण ते सर्व लाबूनच पाहतात आपण जेव्हा ट्रेकिंगला येतो तेव्हा खरा निसर्ग आपल्याला अगदी जवळून पाहण्यास मिळतो

या निसर्गाची ही अद्‌भूत लीला मला इतक्या जवळून पाहायला मिळाली ती, या ट्रेकिंगमुळेच

निसर्गाच्या सान्निध्यात चालत असताना ११ कि मी च अतर कधी मागे पडल ते कळलच नाही समोरच द्वाली कॅम्पचा बोर्ड माझे स्वागत करीत होता परतु या बोर्डाच्या दोन्ही बाजूस दोन रस्ते दोन दिशाना फुटले होते. आणि हे दोन्ही रस्ते चक्क चढ त्यामुळे जरा मी गोंधळलेच. कोणत्या रस्त्याने जाव या विचारात मी, उभी असतानाच मला



नदाखोत शिखर-· पिंडारी ग्लेशियरकडे



नाडाभतार शिखर   काफनी ग्लेशियरकडे

एक पहाडी मनुष्य वरून खाली येताना दिसला

"इकडन सरळ वरती जा येथूनच वरती १० मिनिटावर कॅम्प आहे" त्या माणसान बाजूस हात करून सागितल.

त्याच मराठी बोलणं पाहून मला नवल वाटल मला राहवल नाही मी त्याला विचारलेच

"आप मराठी कितना अच्छा बोलते हैं।" तेव्हा तो हसून म्हणाला.

"अहो, मी मराठीच आहे माझे नाव अजित साने. मी राहणारा पुण्याचा आणि आता येथे मी द्वाली कॅम्पचा-लीडर आहे"

त्याच उत्तर ऐकून मी त्याच्याकडे पाहतच राहिले. कारण तो येऊन आठ-दहा दिवसात राहून एकदम पहाडी माणूस बनून गेला होता

त्याप्रमाणे आमच्याही चेहऱ्यात फरक पडत चालल्याच जाणवत होत. गाल वरती आणि लालबुद झालेले. डोळे बारीक, नाक फुगीर हा सर्व फरक प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होता

कॅम्पजवळ आल्यावर मी जरा दम टाकण्यासाठी सावलीत बसले सावलीत लगेच थडी वाजण्यास सुरुवात होते. मग परत उन्हात येऊन बसले येऊन बूट वैगरे काढेपर्यंत हळू हळू मागून एक-एक जण येऊन धापा टाकत बसत होते.

आमचे हे कुमाऊ मडलचे कॅम्प बहुतेक सर्व उचावरच का आहेत याच कोडं कोणालाच उलगडले नाही.

द्वाली (स स उची ९००० फुट) या ठिकाणी पिडारी आणि काफनी या नद्याचा सगम आहे.

द्वालीला जेवण उरकून आम्हाला लगेच निघायच होतं आमचा मुक्काम 'फुरकियाँ' या ठिकाणी होता द्वाली ते फुरकियाँ हे अतर ५ कि. मी. च आहे परतु हा ५ कि. मी. चा सपूर्ण चढ आहे

या चढामुळ मात्र माझ्या डोळ्यापुढे दिवसा ढवळ्या तारे चमकायला लागले. तारे चमकून किंवा चंद्र सूर्य चमकून काही उपयोग नव्हता चढ तर पार करायचाच होता

मनात येत होत. येथे मुक्काम असता तर किती बर झाल असते परतु विधिलिखित काही वेगळच होत ५ कि. मी. चढ चढून फुरकियाँ कॅम्प गाठायचाच होता.

जेवण कसेबस उरकल तस जेवण जातच नव्हत पण अगात शक्ती आणि पायात चालायला ताकद पाहिजे, यासाठी काही तरी पोटात ढकलायलाच हव होत.

सॅक पाठीवर टाकली आणि परत रस्ता तुडवायला लागले या सॅकमुळे आता खादे पण दुखायला लागले होते दुखरा खादा आणि हुळहुळे पाय याच काही खर नव्हत शेवटी काय?

"आलीया चढासी असावे सादर"

फुरकियाँचा चढ चढायला फारच भारी वाटत होता परतु मी, मगला, मीना आम्ही ठरवल की नाहीतरी फुरकियाँला मुक्कामच आहे लवकर जाऊन तरी तेथे काय करायच आहे

तेव्हा आता हळूहळू निसर्गसौंदर्य डोळ्यान टिपत त्या सौदर्याचा आस्वाद घेत जायच आम्ही अगदी मजा करत करत चाललो होतो तितक्यात पावसाचे थेंब पडू लागले म्हटल आता काही खर नाही

पाऊस जर आला तर पाठीवरची बॅग साभाळीत चढ कसा चढायचा? पावसात हालत फारच बिकट झाली असती वरुण राजाला मी मनातच प्रार्थना केली.

'आमच्या बॅचचे सर्व कॅम्पवर व्यवस्थित पोहचू दे मग तुला किती पडायचा तेवढा पड'

अखेर मेघराजाने माझी प्रार्थना ऐकली असावी कारण पाऊस पडायचा बद तर झालाच पण त्यान आम्हाला

रस्त्यात कुठेही छळल नाही.

बागेश्वरला समीरन सागितल होत की वरती फार पाऊस आहे परतु आम्हाला पावसाचा कुठेही त्रास झाला-नाही आमच्या नतरच्या बॅचला मात्र पाऊस फारच लागला फुरकियाँला वर चढत असतानाच तेथील वातावरण फारच थड वाटत होत. थडी दिवसेंदिवस वाढत होती. स्वेटर कानटोपी अपुरी वाटत होती नाकाचा शेंडा थंडगार लालबुद झाला होता.

फुरकियाँकडे धीरे कदम जात होतो डावीकडे डोंगरावर पाढऱ्या शुभ्र मोत्याच पोत फुटल होत. ते धारेच्या रुपान अखड खाली साडत होत. खाली मोत्याचा ढीग पसरला होता. ते पाढरे मोती म्हणजे धबधबा आणि ढीग म्हणजे ग्लेशियर होय.

असख्य धबधब्याच्या माळा पाहत आम्हीं चाललो होतो ५ कि मी. अतर काही तुटता तुटत नव्हत.

दुष्काळातील व्यक्तीनी ढगाकडे आशाळभुत नजरेन पाहाव तसे सारेजण वरवर जाणाऱ्या वाटेकडे पाहत होते

लहान मुल लपाछपी खेळतात, अचानक समोर येऊन "कस फसवल!" करतात. अगदी तसच फुरकियाँ कॅम्पने केलं. अगदी जवळ जाईपर्यंत कळत नाही, कॅम्प कुठे आहे, किती लाब आहे. चढ चढला की. कॅम्प समोरच दृष्टीस पडतो

फुरकियाँ या शब्दाचा अर्थ स्थानिक भाषेत फडकणे/उडणे फुरकियाँ कॅम्पची स. स उची १०७०० फुट आहे

आमच्या कॅम्पजवळच पहाडी लोकाची टपरी होती ती टपरी म्हणजेच घरगुती हॉटेल आम्ही त्या टपरीत गेलो, तर तिथ एक विदेशी माणूस चहा-बिस्किट खात असताना दिसला

खरच हे फॉरेनर कुठे कुठे भटकत असतात. आणि ते पण एकेकटेच, कसलीही भीती न बाळगता.

आम्ही त्या रात्री कॅम्पच जेवण घेतलच नाही. त्या टपरीशी जाऊन मॅगीची आणि डबलआम्लेटची ऑडर दिली. तिथं सात वाजताच अधार गुडुप झाला होता. थडीच प्रमाण वाढतच होत. सगळे होते नव्हते तेव्हढ्या उबदार कपड्यानी अंग झाकून घेतल

ती रात्र अजूनही माझ्या डोळ्यासमोर दिसत आहे. टपरीतल्या शेकोटी जवळ बसून आम्ही गरम-गरम मॅगी आणि आम्लेट खात होतो. खरच काय चव लागली होती त्याची. मी मगला, मीना, मयुरी, अर्चना आम्ही सगळ्याजणी एकमेकाना चिटकून बसलो होतो. आमच्या अवती भोवती तेथील पहाडी रहिवासी बसले होते. त्याच्यामध्ये एक छोटा मुलगाही होता. ती सर्व जण रगान गोरे, शरीरान उच आणि साधारण नेपाळी लोकासारखे दिसायचे त्या छोट्या मुलान मग त्याची पहाडी गाणी अगदी नाचून गाऊन म्हटली. त्याच्या गाण्यात आम्ही सगळ्याजणी सामील झालो. आमच्या टाळ्याच्या तालात तो मुलगा अगदी गाण्यात रंगला होता. त्यान बरीच गाणी म्हटली. त्याच ते एक पहाडी गाण "हसा हो मेरी हसा मिलनेको मेरी मन्सा रे" असेच काहीसे त्या गाण्याचे बोल होते ते गाण आजूनही मी कधी कधी गुणगुणत असते

सगळीकडे नीरव शांतता, आजुबाजूला उभे असलेले काळेभोर पहाड, ती टपरी, शेकोटी, ती पहाडी माणस आणि त्याचं ते पहाडात घुमणार पहाडी गाण या गोष्टी अजूनही माझ्या डोळ्यांसमोर तरळत असतात. खरच त्या रात्रीचा हा प्रसग विसरणे अशक्यच.

तेथील पहाडी लोकाच मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्यांच वागण एकदम निरागस, शात. आम्ही मुली इतक्या त्याच्या जवळ बसलो होतो पण त्याची नजर वाईट दिसली नाही. किंवा त्यांच्या वागण्यात काही फरक जाणवला नाही. त्याच्या बोलण्यात तर कधीच वरचा सूर दिसला नाही. त्याच

बोलण नेहमीच नम्र वाटायच तशीच त्याची मदतीची भावना व कष्टाळू वृत्ती पण दिसून आली

रस्त्यात जर कोणाला त्रास झाला किंवा अजिबात चालवत नसल आणि अशावेळी जर हे लोक रस्त्यात भेटले तर, ते स्वहून मदतीला धाऊन येत दुसऱ्याच्या पाठीवरच ओझ नको म्हटल तरी स्वतःच्या पाठीवर घेत. पाच सहा दिवसात या पहाडी लोकामध्ये आणि या पहाडात, मी, तर शहराचे वातावरण पार विसरूनच गेले होते

शहरातल्या माणसात आणि या माणसात खरच किती फरक आहे इथली ही पहाडी माणस गरीब कष्टाळू जरूर असतील परतु ही माणस इकडच्या निसर्गाप्रमाणेच सुदर, स्वच्छ, निर्मळ मनाची आणि मुख्य म्हणजे आनदित आहेत

तोंडातल्या तोंडात गाणी गुणगुणतच आम्ही आमच्या कॅम्पमधल्या लेडीज रूम मध्ये गेलो. सर्वजणी जागा धरून झोपल्या होत्या थडीने मात्र उग्र रूप धारण केल होत. अगावर सगळे होते नव्हते तेव्हढे उबदार कपडे स्लिपिंग बॅग, ब्लॅकेट इतके सगळे असतानासुद्धा रात्रभर आम्ही थडीन कुडकुडत राहिलो मी तर तिथल्या थडीन रात्रभर कुडकुडत होते, कण्हत होते त्या रात्री थडीमुळे कोणालाच चागली झोप लागली नाही. फुरकियाँची ही थडी मात्र सर्वांच्याच लक्षात राहील कारण तिथे थडीचच थैमान होत

# तेवीस मे त्र्याण्णव

फुरकियाँ येथील कॅम्पलीडर अनिल मते यानं सर्वांना ४.३० लाच उठवले. नाहीतरी रात्री कोणाला झोप नव्हतीच.

आमच्या बरोबरच्या काही मुली बुटाना मेणबत्ती घासताना मी पाहिल्या. तसेच त्या पायात मोजे चढवल्यावर प्लास्टिकची पिशवी घालून मग बूट घालत होत्या. मला हे सर्व नवीन होते.

"तू बुटाना मेणबत्ती का घासत आहेस?" मी शलाकाला विचारलं. शलाकाने पायात बूट चढवताच उत्तर दिले.

"मेणबत्ती घासल्यामुळे बर्फ बूटावर राहत नाही. चुकून बर्फ जर बूटात गेलाच तर प्लॉस्टिकच्या कागदामुळे मोजे ओले होत नाहीत."

या गोष्टी आम्हाला काही सांगितल्या गेलेल्या नव्हत्या त्यामुळे मी व मंगलाने प्लॉस्टिकची पिशवी व मेणबत्ती शोधून शोधून मिळवली. या गोष्टींमुळे पुढे बर्फात बूट व बूटामुळे पाय जास्त थंड पडले नाहीत.

पहाटे ४.३० ला उठलो तरी निघायला उशिरच झाला. कारण पिंडारी वरून १२ च्या आत परतायचं होतं. १२ च्या नंतर तेथील हवामानात बदल होतो असं आम्ही ऐकलं होतं. आमचे ऐकमेव ध्येय पिंडारी,तेथे आम्ही निघालो.

फुरकियाँ ते पिंडारी हे अंतर ७ कि.मी. आहे

पिंडारी पासून झिरो पॉईंट १ कि. मी दूर आहे.

पिंडारीला जाताना आम्ही सर्व ज्याची वाट पाहत होतो तो बर्फ दिसू लागला जेव्हा मी प्रथमच एक छोटासा हिमखड पाहिला तेव्हा आम्हाला फारच आनद झाला आपल्याकडे शहरात आपण फक्त फ्रिजमधला बर्फ पाहतो पण येथे तर बर्फच बर्फ आणि तो ही स्वच्छ पाढराशुभ्र

गुढघे दुखत होते. मागे पुढे पाहणे चालल होत डाव्या हाताला खाली पिंडारी नदी वाहत होती. स्नोपॅच वरून साभाळत, तोल सावरीत चाललो होतो, रस्ता तसा व्यवस्थित, परतु तोल गेला तर १००० फुट खोल नदीत घरगळत जाण्याच भय होत

उजवीकडे सूर्य हळूहळू वर येत होता सगळा परिसर उजळत चालला होता डोंगराच्या आमच्यावर पडलेल्या सावल्या आखुड होत होत्या.

मध्येच एके ठिकाणी देऊळ दिसल. तिथच पायलेट बाबा राहतात अस कळल, पायलेट बाबा हे खरोखर पायलेट आहेत जीवनात विरक्ती हवी म्हणून ते हिमालयात आलेले. त्याच्याविषयी मला एव्हढच कळल बस

बरच अतर चालून झाल्यावर पिंडारी ग्लेशियरला पाय लागले सारे श्रम कापरासारखे भुर्रकन उडून गेले बर्फात पावल पडू लागली तेव्हा, शरीराचा सर्व शीण निघून गेला. पायातली ताकद जणू काही पूर्ववत आली

कितीतरी डोंगर पार करून मी ज्या हिमालयाची वाट पाहत होते, त्याच हिमालयाच्या कुशीत आता मी शिरत होते खर म्हणजे माझ स्वप्नच माझ्यासमोर मूर्तस्वरूपात मी पाहत होते आणि माझ मलाच आश्चर्य वाटल.

सगळीकडे बर्फ पसरलेला आणि मध्येच काळे खडक त्यातून डोकावताहेत जणूकाही एखाद्या गोऱ्यागोमट्या माणसाच्या डोक्यावरचे टक्कल दिसाव तसे मला ते खडक दिसत होते



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६८३
२८७३६८
२९।३।०४

या पाढऱ्या शुभ्र गादीवर आडवी पडून मी वरती नजर टाकली खरोखरीच मला स्वर्गसुख प्राप्त झाल्यासारख वाटल

"खरच हिमालय तो हिमालयच"

हिमालयाची तुलना कोणाशीही अशक्यच आहे. परतु हाच हिमालय पर्वत मला एखाद्या ऋषिमुनीसारखा तेजस्वी व शात वाटला

आलेल्या सर्व सकटाना तोंड दिले तर, तुम्हाला अस स्वर्गसुख प्राप्त करुन घेता येईल, ही गोष्ट, हिमालयान हळूच माझ्या कानात सागितली. कारण या हिमालयापुढ आपण मनुष्य किती क्षुद्र आहोत याची भावना निर्माण झाली या विराट आणि विशाल हिमालयाच्या कुशीत विसावताच शरीराच्या सर्व व्याधी नष्ट झाल्या. शरीरात एक प्रकारची चेतना जागृत झाली शरीर आणि मन पवित्र झाल्यासारख वाटल नकळत माझ्या मुखातून शब्द बाहेर आले

'लेक मी सह्याद्रीची
विसावले हिमालयाच्या कुशीत
कळल आजच मला
स्वर्ग सुखाच गुपित!'

खर तर हिमालयाच वर्णन करायला माझे शब्द अपुरेच पडतील अस म्हणण्यापेक्षा ते शब्द येथील बर्फानेच थिजून जातील.

'या शरीराची नाही केली दयामाया
पाहते डोळे भरुनी तुज हिमालया'

हिमालयाचे नेत्र सुख घेताघेताच त्याच्या दर्शनाने माझ्या डोळ्याच पारण फिटल मन तृप्त झाल आयुष्याच सोन झाल अस वाटल

आम्ही जेव्हा पिंडारी वरुन झिरो पॉईंटला पोहचलो, तेव्हा, अकरा वाजून गेले होते. तेथे वरती गेल्यावर एक पाटी लावली आहे पण त्या पाटीच्या पुढे थोड्या

अतरावर कच्च्या मातीच्या ढिगावर एके ठिकाणी "पिंडारी '०' पॉईट" असे दगडावर लिहिलेले आहे तसेच तिथे एक निशाण पण लावलेल आहे. अस म्हणतात की हा पॉइंट २००० फुट अलिकडे घेतलेला आहे कारण लँडस्लाईड वा भुस्खलन इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेले आहे की पुढे जाण केवळ अशक्य आहे ट्रील पास या ठिकाणाहून ग्लेशियर सुरू होते. पुढे ते गालीच्या सारखे पसरत गेलेले आहे

आम्हाला अभ्यकर काकानी सागितले

"त्या पाटीच्या पुढे जाऊ नका कारण रस्ता बरोबर नाही म्हणण्यापेक्षा रस्ताच नाही"

ते समोरचे निशाण हवेत उडत होते ते पाहिल्यावर आम्ही ठरवल, काही झाले तरी, त्या झेंड्याला हात लावून मगच परतायच

एकमेकींचा हात धरत, एक मागे, एक पुढे असे करीत आम्ही त्या झेंड्यापर्यंत पोहोचलो आणि एकदाचा त्या निशाणाला हात लावला तेव्हा मात्र आमचा आनद गगनात मावेनासा झाला एकीकडे आनद तर दुसरीकडे भीती वाटत होती कारण आम्ही जेथे बसलो होतो ते ठिकाण म्हणजेच 'पिंडारी ० पॉईट' हे स स. १२५०० फुट उचीवर आहे आम्ही ज्या ठिकाणी उभे होतो, तो, भाग कधी खाली कोसळेल आणि आपणही खाली जाऊ शकतो हे अनिल मते यान सागितल येथूनच पिंडारी नदीचा उगम दिसतो. कच्च्या मातीचे ढिगारे इतस्तत: पसरलेले होते त्यातून पिंडारी नदीचा उगम होता

झिरो पॉईटचा आणि त्या निशाणाचा निरोप घेऊन आम्ही तेथून निघालो आता ग्लेशियरवरून खाली उतरायचे होते मग आम्ही सर्वांनी त्या बर्फावरून खाली घसरून जाण्याचे ठरवले. आम्ही पावसासाठी आणलेले रेनकोट बर्फात कामाला आले.

मी रेनकोट कमरेला बाधला व बर्फावरून खाली घसरण्यास सुरुवात केली सिनेमातील दृश्य जी स्वप्नात दिसायची तीच दृश्य मी आज जिवंत अनुभवत होते. ही बर्फाची घसरगुडी मला फारच आवडली शेवटी जेव्हा घसरून पूर्ण खाली आले. तेव्हा माझा

रेनकोट संपूर्ण फाटला होता पाठीमागचा भाग बर्फाने चागलाच शेकला म्हणजे गारठला होता. बर्फ ऐकमेंकीवर टाकीत असतानाच दुपारचे १२ कधी वाजून गेले ते कळल सुद्धा नाही आमची बाकीची मडळी सर्व पुढे निघून गेली होती. येथील हवामानातही आता फरक जाणवू लागला झिरो पॉईंटला येथील हवेच्या दाबामुळे माझ्या छातीत पण दुखायला लागल होत मग मात्र माझी बोबडी वळली

आम्ही तिघी चौघीजणी घाबरत घाबरत परतीच्या मार्गाला लागलो. आता ग्लेशियर पार करणे धोक्याचे वाटत होते

वरून बर्फ उन्हामध्ये वितळून खाली घरगळत यायचा कितीतरी ठिकाणी बर्फाचे पाणी होण्यास सुरुवात झाली होती रस्त्याने तर आता येताना जेव्हढा बर्फ लागला होता त्याच्या आधिक बर्फ आम्हाला जाताना लागला आणि या बर्फातून चालायचे म्हणजे अगदी दिव्यच होतें जरा जरी पाय घसरला तर गेलोच खाली खाली खोल हिमनदी तर इतक्या वेगाने धावत आहे, की तिच्या नुसत्या आवाजान आमचे कान कामातून गेले होते. केव्हढा तो प्रचड खळखळाट आपल्यापुढे अगदी थोड्या अतरावर जरी कोणाला हाक मारली तरी ती पुढच्या व्यक्तीला ऐकू जाणारच नाही. या नदीच्या आवाजान कानाला त्रास होऊ नये म्हणून कित्येकानी कानात कापसाचे बोळे घातले होते.

आता वरून ढग खाली यायला सुरुवात झाली होती आमच्या सभोवताली ढग पसरू लागले बर खाली या बर्फातून भराभर ही चालता येत नव्हत. कुठे भुसभुशीत बर्फ, कुठे कडक, तर कुठे नुसते बर्फाचे पाणी या मुळे नीट सावकाश बघून आम्ही चालत होतो एखाद्या चुकीच्या ठिकाणी पाय पडला तर तो बर्फाच्या खड्यात किती खोल जाईल हे सागता येणे अशक्य माझा तर असा दोन ठिकाणी बर्फाच्या खड्यात पाय गेला होता

जितके बर्फ आम्हाला सुदर भासले त्याच बर्फाची आता आम्हाला मात्र भीती वाटू लागली खाली बर्फ, वर ढग या परिस्थितीत डोळे पाढरे झाले होते. निसर्ग जेव्हढा सुदर

तेव्हढाच तो भयानक असू शकतो याची मला प्रथमच प्रचीती आली

एके ठिकाणी चालताना तर अगदीच छोटी पाऊलवाट लागली वाटेच्या उजवीकडे खाली खोल पिंडारी नदी चित्कारते आहे. आणि डावीकडे वरतून दगड, माती खाली घसरत येत आहे अगदी भुसभुशीत माती त्यामुळ तेथून पलिकडे जाण्यास आम्ही श्वास रोखून धरला होता कारण या मातीवरून कधी पाय घसरेल ते सागता येणे अशक्य मी व नैना तर खाली बसत बसत व दोन्ही हात घट्ट मातीत रोवत पलिकडे गेलो पलिकडे जावून आम्ही उभे राहत असतानाच वरतून एक मोठा दगड खाली घरगळत आला व त्या वाटेवरून खाली नदीत जाऊन सामावला ते दृश्य पाहताच आमच्या अगावर काटा आला तोच दगड जर थोड्या क्षणापूर्वी आमच्या अगावर आला असता तर आम्ही एव्हाना मृत्यूला कवटाळून बसलो असतो. हा जिवावरचा प्रसग टळल्यावर आमच्या जिवात जीव आला. अखेर या सर्व दिव्यातून आम्ही बाहेर पडलो व एकदाचे कॅम्पवर येऊन पोहोचलो.

कुठेही विश्राती न घेता कॅम्पवर जवळ जवळ धापा टाकीतच आले पण येथे ही आता जास्त वेळ बसून उपयोग नव्हता. कारण जेवून लगेच खाली द्वालीला जायच होत सर्वांच्या पायाचे तर अवसान गळून गेल होत पायात प्राणच उरले नव्हते दुसर विशेष म्हणजे येथील निसर्गाचे विलोभनीय दृश्य सोडवत नव्हत. त्याचा निरोप घेताना मग व्याकुळ होत होते निराशेनेच आम्ही तेथून निघालो

आम्ही सर्व ३१ जण झिरो पॉईटला गेलो त्यामुळे अगात उत्साह सचारला होता. त्या धुदीतच द्वालीला आलो वाटेत Pk 3 हा सजय एकबोटे याचा ग्रुप भेटला फारच रेगाळत चालले होते ते की आम्ही विजयाच्या मस्तीत धुद होतो कुणास ठाऊक?

द्वालीला आल्यावर चहाची वेळ टळून गेली होती मग गरम सूप घशात ओतीत जेवण उरकून घेतली. त्या रात्री तेथे 'युवाशक्ती' ची बॅच पाहिली Pk 1 याचा पण मुक्काम होता या बॅच

मधले काही जणच झिरो पॉईंट पर्यंत गेले 'काफनी'चा रस्ता दरड कोसळल्यामुळे बद झाला त्यामुळे तेथेही ते जाऊ शकले नाहीत

त्या रात्री P k 1 बॅचचा कॅम्पफायर म्हणजे त्याची फक्त गाणीच चालू होती आम्हाला काही त्यात त्यानी सामील करून घेतल नाही मुख्य म्हणजे आम्ही सर्व जण इतके थकलो होतो की आमचीच कुणाची कॅम्पफायरला जाण्याची इच्छा नव्हती दुसऱ्या दिवशी आम्हाला आमचे दुसरे ध्येय 'काफनी' पॉईंट गाठायच होत

त्या रात्री आम्ही मग सगळ्या जणी रडत होतो मयुरीचा खादा दुखत होता. मगलाचे पाय, माझी छाती, देशमुख मॅडमच्या पायाची टाच, कुणाला ताप, कुणाला जुलाब, कुणाचे काय तर कुणाचे काय परतु आमच्या बॅचमधील सर्वच मुली चागल्या होत्या. सगळ्या मुलींनी एकमेकाना मदत केली कुणाच्या पायाला फोड आलेले ते श्यामाने व करिश्माने लायटरवर सुई गरम करून ते फोड फोडून दिले व त्याच्यावर चिकटपट्टी लावून दिली. मी मयुरीचा खादा, अर्चनाचे पाय, देशमुख मॅडमचे पाय चोळून दिले अर्चनाने मगलाचे पाय चोळून दिले शलाका ही सुद्धा हाकेला धावणारी मुलगी. आयोडेक्स, अमृतांजन किंवा एखादी गोळी काय पाहिजे ती वस्तू ती पटकन काढून द्यायची

मुबईला आपण आपल्या ताकदीवर जगतो परतु येथे आमची परिस्थिती.

"अवघे धरु सुपथ एकमेका साह्य करु" अशी होती.

# चोवीस मे त्र्याण्णव

पहाटे पाच साडेपाचला आम्ही तयार झालो काफनी ग्लोशियर कडे कूच करण्यासाठी हे अतर तब्बल १३ कि मी आहे म्हणजे त्या दिवशी १३ कि. मी जाऊन व १३ कि मी परत येऊन असे एकूण २६ कि मी. अतर आम्हाला कापायचे होते काफनी पॉईंटला जाताना बर्फ इतक होत म्हणण्यापेक्षा सर्व रस्ता बर्फावरूनच होता शेवटी तर अगदी बर्फावरुन चालण्याचा अक्षरश: कटाळा आला.

पिंडारी नदी पेक्षा काफनी नदीला जबरदस्त वेग आहे. एका शिळेजवळ प्रवाहाचे प्रतिध्वनी ऐकू येत होते येथे भुस्खलन मोठ्या प्रमाणावर होत असाव वृक्षाच्या रागा जो पर्यंत होत्या तेथवर भुस्खलन मोठ्या प्रमाणावर होते तसेच ते जोखमीचीही होते.

द्वालीचा अनुभवी कॅम्पलीडर अजित साने याने आम्हाला "१० ३० नतर जेथे असाल तेथून परत फिरा" असे निक्षून सागितले तरी आम्ही पुढे पुढे जात होतो वेड्यासारखे चाललो होतो. साहस वेडे लोकच करतात नाही का?

पिरॅमिडच्या आकाराच "नाडा भातार" हिमशिखर दिसल. उची १८३१२ फुट त्याच दिशेला साधारण आम्ही जात होतो उजव्या हाताला काफनी नदी वहात होती. डाव्या हाताला सह्याद्रीची आठवण करुन देणारे कातळ खुणावत होते वाटेत प्रचड शिळा निखळून पडलेल्या दिसत होत्या. शुभ्र बर्फात त्या उठून दिसत होत्या त्या शिळाजवळ जाताना आम्ही मुग्धासारखे

दिसत होता. निसर्गाच्या या विशालतेकडे नम्र नजरेने पाहत मार्गक्रमण करीत होतो.

सुरुवातीचा वेग मंदावला होता हृदयाचे ठोके वाढत चालले होते बरेचजण गळालेले होते. आम्ही द्वालीला कॅम्पवर परत आलो. आमच्या ग्रुपचे अनुभवी ट्रेकर ५४ वर्षीय श्री अभ्यकर काका, पुडलीक काका, अर्चना, मयुरी, श्रीकात केळकर आणि आमचा ग्रुपलीडर साईनाथ शिंदे यानी मात्र शेवटपर्यंत चालत राहून अखेर काफनीचा झिरो पॉईट गाठला आम्ही मग त्याच्या यशाचा आनद साजरा केला करजीसारखे - वर्तुळखडासारखे काफनी झिरो पॉईट ११४०० फुट उच आहे पाढऱ्या पार्श्वभूमीवर परस्पर विरोधी दिसणारे काफनी ग्लोशियर आपले वैशिष्ट काही औरच राखून आहे

द्वालीला कॅम्पवर परत आल्यावर आम्ही झोपून किंवा बसून राहिलो नाही लगेच मी व नयना खाली नदीकडे जायला निघालो त्या पहाडातल्या रस्त्याशी जणू आमची ओळख झाली होती प्रथम सुरुवातीला आम्ही थोडी जरी चढण पाहिली की घाबरून जायचो पण आता आम्ही भराभर चढत काय होतो, उतरत काय होतो उड्या मारत मारतच आम्ही नदीजवळ पोहोचलो. त्या नदीचे अगदी जवळून दर्शन घेतल तिच्या सहवासात बराच वेळ घालविला तेव्हढ्यात तेथे काही मेंढपाळ मेंढ्याना घेऊन आले. मला तर त्या मेंढ्याची फारच गमत वाटली किती गरीब जात ती आम्ही त्याना धरायला जायचो तर त्या मेंढ्या किती घाबरून पळत सुटायच्या शेवटी मी एका छोट्या कोकराला उचलून घेतलच त्याचा तो मऊमऊ स्पर्श मला गुदगुल्या करीत होता आणि ते कोकरू बिच्चार माझ्या हातातून सुटण्यासाठी धडपड करीत होत ते मेंढपाळ लोक माझ्याकडे अगदी कुतुहलाने पहात होते

कसली काळजी नाही उद्या भाजी काय करायची, कोणती गाडी मिळेल, ऑफिसला उशिर होईल का? ऑफिसातले काम आटपेल का? या कोणत्याच गोष्टींची या क्षणी तरी मला चिंता

नव्हती. डोक्याला कसला ताप नव्हता मनमुरादपणे मी व नयना तेथे खूप भटकलो तेथील निसर्गात रमून गेलो. झाडे, दगड नदी याच्याशी गुजगोष्टी करीत होतो. मनाला कसली खतच नव्हती

या सर्व गोष्टींमुळे म्हणा किंवा येथील हवामानान माझी तब्बेत अगदी सुधारलेली आमच्यातल्या बहुतेकीची तब्बेत खालावलेलीच एकटी मीच अशी होते की माझ्यावर या सर्व हिमालयीन वातावरणाचा चागला परिणाम झालेला म्हणजे हिमालय अगदी मला मानवलेला

"तू तर आता अगदी नेपाळीच दिसतेस." मगला तर मला सारखी बोलत राहायची. खरच हिमालयान केलेला माझ्या शरीरावरील व मनावरील फरक मला आनदच देत होता.

द्वालीला त्या रात्री कॅम्पफायर मात्र आम्ही अगदी जोशात साजरा केला आज Pk3 ची बॅच मुक्कामी होती आम्ही Pk3 बॅचला आमच्या कॅम्पफायरमध्ये सामील करून घेतल सर्वांनी गाणी तर म्हटलीच पण सगळेजण नाचले सुद्धा त्यातल्या त्यात मगला 'टिमक्याची चोळी बाय' या गाण्यावर फारच छान नाचली Pk3 च्या बॅचमधील एका जोडप्याने एक सुदर गाणे म्हटले त्याच बॅचमधील एका मुलाने "तुम को देखा तो ये खयाल आया जिंदगी धूप तुम घना साया." हे शात गभीर गाण अगदी सुरेख म्हटल या गाण्याच्या वेळी मी बाहेरील काळोखातली शातता व त्यात अपून दिसणारे काळेभोर पहाड पाहत होते त्यामुळे त्या शाततेत ते गाणे ऐकायला फारच मधुर वाटले या गाण्याने मात्र आम्हा सर्वांना मुग्ध केले अमोलची नक्कल श्रीकातच कविता वाचन यानी पण कॅम्पफायरला रग चढला Pk3 बॅचला आमचा Pk2 चा सर्व ग्रुप फारच आवडला रात्री १० वाजता आम्ही अगदी शातपणे झोपलो कारण आमचे जे उद्दिष्ट होत ते आता सफल झाल होत

# पंचवीस मे त्र्याण्णव

सकाळी नाश्ता चहा घेऊन आम्ही द्वालीचा निरोप घेऊन खाली खातीस जाण्यास निघालो द्वाली ते खाती हे अंतर ११ कि मी. असल तरी ते काही इतक कठीण नव्हते. अगदी आरामात चालत आम्ही खातीला आलो

खातीला आल्यावर पहिले बूट काढले या बुटाचा पण आता फारच कटाळा आला होता त्या बुटाबरोबर बुटाच्या नाड्या पण मला वाटत सारख्या लावून सोडून झिजल्या असाव्या मोजे तर दोन जोड वापरून फेकून दिले होते आता तिसरा जोड वापरण्यास काढला होता.

पाणी हात लावता येत नव्हत इतक ते थड होत त्यामुळे कपडे धुणार काय! खातीला जेवून लगेच निघायचे होते आजचा मुक्काम ढाकुरीस होता हा ८ कि मी परतीचा उतार चढ रस्ता ओलांडून ढाकुरीचा पल्ला गाठायचा होता. खातीला जेवण उरकून आम्ही नेहमीप्रमाण कोण पुढ कोण माग अशा रीतीन ढाकुरीला जाण्यास निघालो.

प्रथम आम्ही पाचसहा जणी एकत्रच चालत होतो रस्त्यान गाणी म्हणतच चाललो होतो खरच गाण्यामध्ये आजूबाजूचे डोंगर, झाडी अधिक सुदर भासत होती

ते हिरवेगार डोंगर त्या डोंगरावरील नागमोडी पायवाट आणि मध्येच कोसळणारे पाढरेशुभ्र धबधबे. यामुळे जणू काही त्या डोंगराना हिरवीगार पट्यापट्याची साडी नेसून त्यावर

मोत्याच्या माळा घातल्यासारख्या एखाद्या नवतरुणीच रूप प्राप्त झाल होत

रस्त्यात आम्हाला तेथील पहाडी छोटी छोटी मुल सलाम, टाटा करीत त्याच्या हातावर एखाद चॉकलेट जरी टेकवले तरी ती मुल मिठाई मिळाल्यासारखी खूश व्हायची

या सर्व गोष्टी पहात, अनुभवत आमचा पहिला ४कि मी. उताराचा रस्ता कधी संपला ते कळल नाही उरलेल्या आता ४ कि मी चढाईस प्रारभ झाला या चढावर मात्र एक एक करून सगळ्याजणी पुढे निघून गेल्या मी मग मगलासाठी थाबले

हा चढ चढायला अवघडच जात होता कारण हा चढ तसा रडकुडी आणणारा असा आहे. हा रस्ता उतरताना मला काही वाटल नव्हत सर्वांच्या पुढे मी भराभर उतरत गेले होते पण तोच रस्ता आता चढताना मात्र मी धापा टाकीत होते

येथे मगलाची अवस्था तर फारच दयनीय झालेली तिला आता पाऊल ही पुढे टाकवत नव्हत. मला आता तिची जास्तच काळजी वाटू लागली

"तुझी सॅक थोडावेळ माझ्याकडे दे" मी मगलाला विनविल

"अग, तुझी अवस्था माझ्यापेक्षा काही वेगळी नाही" मगलाने सॅक देण्याचे नाकारले आम्ही तशाच पुढे चालत राहिलो

रस्त्यान चालताना इतकी तहान लागायची घशाला कोरड पडायची. वरून उन्हाच्या चटक्यानी मी तर लालबुद झाले होते

रस्त्यात मिळेल त्या झऱ्याखाली थाबायचो, तोंडावर पाणी मारायचो, विश्रातीसाठी एखाद्या दगडाला टेकून उभ राहायचो, अशी आमची चढावर पायपीट चाललेली.

परतु आता मगलाला बसण्याशिवाय पर्याय नव्हता. उलट बसत बसत ती जास्त थकत चाललेली आमच्या मागे नेहमीप्रमाणे देशमुख मॅडम होत्याच बाकीचे सर्वजण पुढे निघून गेले होते.

चढता-चढता लाबवर एके ठिकाणी मला एक टपरी दिसली. चहा पिण्याची मला फार तलफ आली होती

"ती बघ बहुतेक टपरी असावी " मी आनदाने मगलाला म्हटल कारण ती टपरी अगदी वाटेवरच होती आजूबाजूला घर पण दिसत नव्हती

"आपण तेथे जाऊन चहा घेऊया म्हणजे जरा बर वाटेल आणि आपली तहानही मिटेल " मी बॅग सावरीत बोलत होते. चालत पळत एकदाचे आम्ही त्या टपरीजवळ येवून पोहचलो तेथे अगोदरच साई, मयुरी, अर्चना चहा पीत बसलेले दिसले तेथे पाण्यान स्वच्छ तोड धुतल व गरम एक पेला भरून चहा पोटात रिचवला त्यामुळे आता जरा हुशारी वाटू लागली. पाण्याची तहान चहावर भागवत आम्ही तेथून निघालो

खर म्हणजे आमचा ग्रुप लीडर साईनाथ पण फारच थकलेला दिसत होता

"तुम्ही अगोदर छोटे-छोटे ट्रेक करावयास हवे होते म्हणजे एव्हान त्रास जाणवला नसता " साई सागत होता.

"आम्हाला काय माहित? आम्ही प्रथमच ट्रेकिंगला आलो " मगला वैतागून बोलली

"त्या मानाने खरच तुम्ही ट्रेक सफल केला कारण तुमचा हा पहिलाच ट्रेक आहे आणि तो पण इतका कठिण " साई उत्तरला

"चला, ऐकून जरा बर वाटल " मी गालातच हसत म्हटल

नतर हळू-हळू साई, अर्चना, मयुरी आमच्या पुढे निघून गेले मला वाटल बहुतेक आता ४ कि मी अतर सपत आल असाव परतु पुढे गेल्यावर एका दगडावर पाढऱ्या अक्षरात लिहिले होत ढाकुरी १ कि मी. त्या दगडावरच अतर वाचून परत पुढचा १ कि मी चा रस्ता आमच्या डोळ्यासमोर उभा राहिला

मगलाचे डोळे तर भरूनच आलेले फक्त त्या डोळ्यातून पाणी पडण्याचाच अवकाश होता तिची अवस्था परत 'येरे माझ्या मागल्या' अशीच झाली तिच्या पोटातल पेट्रोल म्हणजे चहा पण सपला असावा त्यामुळे गाडी स्टेशनला म्हणजे ढाकुरीला लागणे एकूण कठिण दिसत होत.

अधार पडायलाही सुरुवात झाली माझी पण छाती

धडधडत होती. तरीही मी मात्र मगलाला धीर देत देत चालवत होते. तिची अवस्था मला पाहवत नव्हती त्याचवेळी पाठीमागून एक पोर्टर आमच्या जवळ येऊन उभा राहिला. त्यान मगलाची अवस्था पाहिली असावी

"मेमसाब आपकी बॅग देना मैं बॅग लेके ऊपर चलता हूँ." त्याने मगलाची सॅक मागितली

"मै ये बॅग ढाकुरीपर रखता हूँ क्योकी मुझे आगे लाहोरखेत जाना हैं। सॅक पाठीवर टाकीत लाब-लाब ढागा टाकीत तो पुढे निघून गेला. आम्ही ज्या रस्त्याला लागलेलो तो रस्ता उच दाट झाडीच्या जगलातून पुढे गेला होता फक्त फुलपाखर सोडून रस्त्याला कोणीच नव्हत. इथ आम्हाला विविध रगाची, नक्षीची फुलपाखरे पाहावयास मिळाली पण ती फुलपाखर ही आता घाबरून पाना-फुलाना बिलगुन बसलेली पक्षी सुद्धा आपल्या घरट्यात परतले असावे. कारण पक्षाची शीळ पण ऐकू येत नव्हती मनुष्यवस्तीचा तर इथ मागमूसही दिसत नव्हता. अशा या जगलातून आम्ही काढता पाय घ्यायचे ठरवल मगलाच्या पाठीवरच ओझ कमी झाल्या मुळे ती आता भराभर चालू शकत होती

"अग, त्या पोर्टरला मी शुक्रिया बोलायचे विसरूनच गेले" मगला म्हणाली

"तो तर आता ढाकुरीला बॅग ठेऊन निघून जाईल खरच हे लोक गरीब खरे पण किती मोठ्या मनाचे." मी म्हटल

चढाचा शेवटचा टप्पा चढताना मात्र मगला बरोबर माझी अवस्था पण बिकट झाली होती अखेर ढाकुरी कॅम्पचे तबू दिसू लागले ते पाहून जरा हायस वाटल परतु कॅम्पला पोहचेपर्यंत आमच अवसान गळून गेल होत या ढाकुरीने मात्र सर्वांना रडवल होत कारण हा चढच मुळी रडीचा आहे

त्या पहाडी माणसान मगलाची बॅंग ढाकुरीस आणून ठेवली होती. आमच्यापुढे आलेल्या मीना, मयुरी, नयना यानी अथरुण वगैरे टाकून झोपण्याची सोय केली होती

मगलान तर गेल्या गेल्या पायातले बूट काढून भिरकावलेच. नशिब कुणाच्या अगावर फेकले नाही कारण ती युवाशक्तीच्या सयोजकावर फारच रागावली होती आणि ती चक्क जोरात रडायलाच लागली तिच ते रडण पाहून मला काळजी वाटली. म्हटल ही उद्या चालेल की नाही ती रडत असतानाच देशमुख मॅडम येऊन पोहचल्या.

"या लोकाना काही कळते की नाही एका दिवसात काय एव्हढ चालवायच असत" मगलाची बडबड चालू होती

"अग, रडायला काय झाल उद्या सकाळी तू ठणठणीत बरी होशील या गोळया घे आणी शात झोप" देशमुख मॅडम तिला धीर देत म्हणाल्या.

"काल मगला तू किती छान नाचलीस आज नाही का नाचणार, टिमक्याची चोळी बाय रगान फुलयली" मीनाच मगलाला चिडवण चालूच होत त्याबरोबर मगलासकट सगळयाजणी हसू लागल्या

मला तर देशमुख मॅडमची खरोखरच कमाल वाटली. आमच्या पेक्षा वयाने सर्वात जास्त, त्यात त्याच्या पायाची दुखणारी टाच, पायाना आलेले फोड, इतक सर्व होऊनही त्याच्या चेहऱ्यावर मात्र कसलाही भीतीचा, पश्चात्तापाचा आणि मुख्य म्हणजे थकवा याचा मागमुसही दिसत नव्हत पूढच्या ट्रेकसाठी त्या आतापासूनच तयारीत होत्या.

त्या दिवशी जेवणात शेवयाची खीर होती खीर खरच चविष्ट झालेली मी मगलाला जबरदस्तीने जेऊ घातल आम्ही सगळ्याजणी त्या दिवशी फारच थकलो होतो कॅम्पफायारला न जाता आम्ही गुपचुप झोपून घेतल खैरनार काकानी मात्र आमची व्यवस्था अगदी चोख केलेली प्रत्येकाला स्लिपिंग बॅग, दोन ब्लॅकेट स्वत आणून दिले

आमचा डोळा लागत असतानाच एका मधुर आवाजान आम्हाला मोहित केल. आमचे पाय इतके थकले होते तरी त्या आवाजाच्या दिशेन नकळत उठून चालू लागले जिथे

कॅम्पफायरला सर्वजण बसले होते त्या दिशेला पाय वळू लागले तिथे पाहतो तर काय खैरनार काका माऊथ ऑर्गन वाजवीत होते रात्रीच्या शातवेळी तो आवाज कानाला किती गोड वाटत होता त्या वेळी कटारिया अकलनी पण जुनी गाणी म्हटली त्यात 'जुल्मी सग आँख लडी' हे गाणे तर फारच उकृष्ट म्हटल त्या गाण्यातून मी जेव्हा बाहेर आले तेव्हा माझी नजर समोर दिसलेल्या चद्रकोरीवर खिळून राहिली आज कितीतरी दिवसानी मी चद्र न्याहळीत होते आणि तो पण इतका जवळून ढग, धुक, पावसाळी वातावरण यामुळे चद्र, सूर्य याच दर्शन अगदी दुर्मिळ असायच

एखाद्या तपस्वीप्रमाणे समाधी लावून बसलेले ते उच पहाड त्यात ती चद्रकोर उठून दिसत होती त्या चद्रकोरीच्या मागे एक उच पहाड दिसत होता ती चद्रकोर त्याच्यावर विराजमान झाल्यासारखी वाटत होती

कैलासपती शकराच्या डोक्यावर चद्रकोर असते त्या प्रमाणे त्या पहाडाला चद्रकोरीमुळे जणू शकराच रूप प्राप्त झाले होते. बहूतेक या जगलात कोण आलय, कोण सुदर गाणी म्हणतय हे पाहण्यासाठी जणू काही ती चद्रकोर ढगाचा आडोसा बाजूला करून डोकावून पहात असावी

बाहेर थडीन मी काकडत होते परतु हे सुदर दृश्य सोडण्यासही माझा धीर होत नव्हता

उद्या आमच्या ट्रेकचा शेवटचा दिवस होता आणि उद्यापण आजच्यासारखी बरीच पायपीट करावी लागणार ११ कि मी. लोहारखेत व लोहारखेतवरून खाली ५ कि मी सोंग इतका पल्ला गाठायचा होता त्यामुळे आता विश्राती घेणे आवश्यकच होते

# सव्वीस मे त्र्याण्णव

पहाटे जाग आली. आता पहाटे उठण नित्याचच झालेलं त्यामुळे जाग येण साहाजिकच होत नेहमीप्रमाणे आम्ही तेथून निघण्यास तयार झालो तितक्यात तेथे पाऊस सुरु झाला म्हटल आता काही खर नाही एकतर थडी एव्हढी जाणवत होती, की त्या थडीन खोलीच्या बाहेर पडायचीआमची हिंमत होत नव्हती. सर्वांचे रेनकोट, विलशिटर बर्फात फाटले होते मग सगळ्यानी फाटलेले रेनकोट शिवायला सुरुवात केली कोण नुसत्याच पिना लावून जोडण्याचा प्रयत्न करीत होते ते मजेदार दृश्य अगदी पाहण्यासारख होत परतु थोड्याच वेळात तेथील पाऊस पळाला आणि चक्क रवीन आपली सोनेरी किरण फेकून झलक पण दाखवली जणू पाऊस आमची गमत पाहण्यासाठीच आला असावा

शेवटी ते फाटके तुटके रेनकोट परत सॅकमध्ये कोंबून आमची चलती का नाम गाडी सुरु झाली. गरम गरम बोर्नव्हिटा पिऊन आम्ही खैरनार काकाचा निरोप घेतला आणि १ कि मी चा चढ चढण्यास प्रारभ केला.

चढ चढत असतानाच नेहमीप्रमाण गरम व्हायला लागल मग एक-एक करून कानटोपी, हातमोजे, स्वेटर हे गरम कपडे काढून टाकले कालच्या त्या भयकर चढापुढे हा चढ म्हणजे काहीच नव्हता. खर सागायच तर एका दमातच आम्ही हा १ कि. मी. चा चढ पार पाडला

आज मगलची तब्बेत पण ठणठणीत वाटत होती काल मला पडलेली तिची काळजी आज दूर झाली होती

पाऊस पडून गेल्यामुळ सुखद गारवा निर्माण झालेला मातीचा सुगध सुटलेला गार वारा अगाला झोंबत होता माती तिचा सुगध नाकात कोबत होती ही नैसर्गिक बळजबरी मला फारच आल्हादायक वाटली

उतरणीच्या रस्त्याने खाली उतरत असताना एक-एक करून ढग सुद्धा खाली खाली येऊ लागले त्याना पण आमची सगत हवी हवीशी वाटत असावी. सर्वत्र ढगच ढग आमच्या सवगड्यासारखे दिसत होती ती फक्त पायाखालची वाट आजुबाजूला काही म्हणजे काहीच दिसत नव्हत जणू ते ढग तुम्ही जाऊ नका म्हणून आमची वाट अडवीत होते त्या ढगात तर मी पूर्ण ढगमयी होऊन गेले होते.

उताराच्या रस्त्यावर उड्या मारत चालताना मी एखाद्या पाखराप्रमाणे त्या ढगातून उडतच चाललेली. त्या ढगाळ वातावरणात मी एव्हढी हरखून गेले होते की क्षणभर मला सर्वांचा विसर पडला पख लावल्यासारखे मी आकाशातून ढगातून विहार करीत आहे असच मला वाटू लागल हा प्रवास कधी सपू नये अस वाटू लागल स्वर्गसुखाची तृप्तता मला पुन्हा इथे अनुभवता आली

पक्षाच्या मधुर शिळेने मी भानावर आले शीळ घालून ते पक्षी सुद्धा मला निरोप देत असावे खरच या पक्षाची भाषा ज्या माणसाना कळते ती माणस किती आनद उपभोगीत असतील मला जर या पक्षाची भाषा कळली असती तर, मी कितीतरी गप्पा, मारल्या असत्या उचावर लाब कुठे तरी दडलेले हे पक्षी त्याच्या मजुळ आवाजान जणू ते माझ्याबरोबरच आहेत अस वाटत होत

जस जशी मी खाली जात होते तस-तसा एक एक ढग विरळ होत होता आजूबाजूच वातावरण निवळत चाललेल. त्या सुदर वातावरणातून मी आता वास्तव जगात येत होते

समोरच दूरवर एक सपाट मैदान आणि त्या मैदानात एक टपरी दिसू लागली मी व मगला आम्ही धावतच त्या टपरीजवळ

येऊन पोहचलो. आमच्या बॅच मधले बरेचजण तेथे थाबलेले दिसले

त्या टपरीमध्ये एक पहाडी रहिवासी भजी तळताना दिसला आता सर्वजण येथे कशासाठी थाबले याचा मला उलगडा झाला कोणता तरी पाला त्या माणसाने उपटून आणला तो पाला पालकाच्या भाजीसारखा दिसत होता परतु पालक मात्र निश्चित नव्हते त्याने तो पाला हातानेच तोडून, पिठात कालवून त्याची खमग भजी केली

आज किती दिवसानी माझ्या तोंडाला त्या भज्याची चव आली पुष्कळ दिवसानी भज्यासारखा पदार्थ आम्हा सर्वांना खावावयास मिळाला त्या थड वातावरणात, सुखद गार हवेत ती गरम-गरम भजी म्हणजे आमच्या सारख्या रानपाखरासाठी तो अनमोल मेवाच होता गरम भज्याचा आस्वाद घेऊन थोडस गरम होऊन आम्ही परत आमच्या उतरणीच्या मार्गाला लागलो

आम्हीं सर्वजणींनी आता एकत्रच जायच ठरवल आजूबाजूला नटलेल्या हिरव्या वनश्रीच सौदर्य पहात व गाणी म्हणत आम्ही रमत-गमत चाललो होतो मीनान तेव्हा बरीच सुदर गाणी म्हटली. "शुक्रतारा मदवारा" आणि "ये है रेशमी जुल्फोंका अधेरा ना घबराईये" ही गाणी तिला तर आम्ही परत परत म्हणावयास लावली तेथील वातावरणात ही गाणी ऐकावयास फारच गोड वाटली

जेव्हा मी येथून वर चढून गेले तेव्हा मी निश्चय केला होता की येथील दगड घरी घेऊन जायचे हे साधे दगडच, परतु हिमालयामुळे येथील दगडाना सुद्धा एकप्रकारचे सौंदर्य व महत्त्व प्राप्त झाल आहे सूर्य किरणात हेच दगड सोने-चादीसारखे चमचम करायचे मला ओझ झाल तरी चालेल परतु हे हिमालयाच्या पायथ्याचे दगड घेऊन जायचेच

लहान-मोठे चागले दहा-बारा दगड मी माझ्या बॅगमध्ये टाकले लकेत सोन्याच्या विटा सापडाव्या त्याप्रमाणे हे चमचमणारे दगड म्हणजे माझ्या दृष्टीन अलभ्य लाभच होय

वेड्यासारखी मला दगड गोळा करताना पाहून इतरजणी

मला हसत होत्या परतु मला त्या हसण्याची किंमत वाटली नाही किंमत वाटली ती या दगडाची. हिमालयाच्या पुण्यभूमीत राहून हे दगड सुद्धा मला पवित्र व सुदर वाटले तर मग मनुष्य का नाही सुदर व पावन होऊ शकणार या पुण्यभूमीत राहिल्यावर हिमालयाच हेच खर वैशिष्ट्य आहे

निसर्गाच्या या रम्य वातावरणाशी हितगुज करीतच आम्ही लोहारखेतला आलो. आम्हाला अगदी लवकर आल्यासारख वाटल. मीनाने तर सर्व कॅम्पची नावच बदलली होती 'पिंडारी'चे पढरी, 'काफनी' चे फुकनी, 'द्वाली' चे डॉली 'ढाकुरी' चे धाक-ऊरी, आणि सोंग चे तर सुअँग केल होत त्यामुळे ती कधी पण या टोपण नावानच बोलायची

"या पढरीने फारच अत पाहिला. खऱ्या पढरीला गेलो असतो तर तो पाडुरग तरी पावला असता"

"अजून सुअँगला जायचय आपल्याला" अशा प्रकारच्या तिच्या बोलण्यान आमची मात्र हसून पुरेवाट व्हायची

लाहोरखेतला छानपैकी जेवण केलें लोणच, पापड यामुळ जेवणाला जरा मजा आली बुटानी व पायानी पण थोडावेळ विश्राती घेतली. खाली सोंगला आमची बस उभी राहणार होती. आता या ट्रेकिंगचा हा शेवटचा उतार शिल्लक राहिलेला. जेवण उरकून आम्ही उताराच्या मार्गाला लागलो.

आम्हाला उतारावर तेथील पहाडी मुल भेटली. आमची ती उतरतानाची कसरत पाहून बहुधा ती मुले आम्हाला हसत असावीत

"तुम्ही कुठे चालला आहात?" मी त्या मुलाना विचारल.

"आम्ही येथे गुरे चरायला आणली आहेत." त्यातील एक गोरीपान चुणचुणीत मुलगी म्हणाली

"पण, तुमची गुर कुठ आहेत?" मी विचारले

"ती गुरे खाली चरायला गेली आहेत त्यानाच आता आणायला आम्ही खाली चाललो आहोत." ती छोटी मुलगी म्हणाली.

"तुमचे घर कुठ आहे?" माझा तिसरा प्रश्न तिन समोरच्या डोंगराकडे बोट दाखविले मी आ करून पाहतच राहिले

"तू शाळेत जातसे का? कुठ आहे तुझी शाळा?" माझी प्रश्नाची सरबत्ती चालूच होती

त्या मुलीन होकारार्थी मान हलवून बाजूच्या दुसऱ्या एका उच डोंगराकडे बोट दाखविले.

आता मात्र मी मोठा आ करून पाहतच राहिले

आपल्याला नुसत आता ५ कि. मी खाली उतरायचे आहे या विचारानेच सार अवसान गळाल होत आणि ही येथील छोटी-छोटी मुले याना हे डोंगर म्हणजे काहीच वाटत नाही. शाळा एका डोंगरावर, घर दुसऱ्या डोंगरावर तर खेळायला हि मुल तिसऱ्याच डोंगरावर त्यामुळे आमची ही अवस्था पाहून ती मुले आम्हाला हसतील नाही तर काय नंतर त्या मुलानी आम्हाला टाटा करून हसत हसतच निरोप दिला

हा सपूर्ण रस्ता सरळ उताराचा व खडकाचा आहे या दगडामुळे पाय अगदी खिळखिळे झाले होते कधी एकदा सोंग येईल अस झाल होत मी आणि मीना आम्ही तो रस्ता तेथील पहाडी माणसानाच विचारायचो ते लोक रस्ता बरोबर दाखवायचे किंवा काही वेळा ते जवळचा रस्ता पण दाखवायचे त्याना येथील सर्वच रस्ते परिचित, कारण मुख्य रस्त्याला इतके रस्ते फुटले आहेत की खरा रस्ता कोणता हे कळायला विचारल्याशिवाय मार्गच नव्हता. त्यामुळे आम्ही दोघीजणीनी बरोबर न चुकता सोंग गाठल. परतु आमच्यातले बरेचजण सापशिडीचा खेळ खेळत होते कोण भलत्याच रस्त्यानी खाली जायचे, परत रस्ता चुकला म्हणून परत वर यायच आणि परत खाली यामुळे सोगला येण्यास बऱ्याच जणाना उशिर झाला

आमची बस दिसल्याबरोबर सर्वांच्या चेहऱ्यावर "सुटलो! एकदाचे" हाच भाव पाहण्यास मिळाला माझ्या जवळची काठी मी येथेच सोंगला ठेऊन दिली बरीच साथ दिली होती बिचारीने 'जेथे जाई तेथे काठी माझी सागाती' होतीच

बस चालू झाल्यावर अखेर आम्ही सर्वांनी हात जोडून हिमालयाचा निरोप घेतला आमची बॅच यशस्वी झाली. काही विपरीत घटना न घडता पहिलीच यशस्वी होऊन परतलेली 'युवाशक्तीची' ही P k 2 बॅच होय त्यामुळे आमच्या सर्वांच्या तोंडावर आनद ओसडून वाहत होता. ग्रुप लीडर साई याला पण धन्य वाटत होत बस मध्ये मी पहिल्या गाण्याला सुरुवात केली.

"हम हो गये कामयाब, हम हो गये कामयाब," हे गाणे सर्वांनीच उत्साहान म्हटल त्या नतर श्यामा, करिश्मा प्रीती, अर्चना, शलाका यानी नवी, जुनी सर्व प्रकारची गाणी म्हटली आम्ही टाळ्या वाजवून साथ देत होतो या आनदाच्या भरात आम्ही बागेश्वरला कधी येऊन पोहोचलो ते कुणाला समजलच नाही

बागेश्वरला बसमधून उतरताच समीरन आमच सर्वांच अभिनदन केल तेव्हा आमचीही छाती अभिमानाने भरून आली रूम मध्ये गेल्या गेल्या मात्र सर्वांनी अगदी स्वच्छ आघोळ केली कारण सात-आठ दिवस आघोळ नव्हती आघोळ करून आम्ही चहा घेण्यासाठी सर्वजण कन्टिंमध्ये बसलो होतो.

इतक्यात तिथ पाऊस सुरु झाला नुसता पाऊसच नाही तर पाऊस आपल्याबरोबर गारा सुद्धा घेऊन येत होता. गारा म्हणजे छोट्या छोट्या गारा नव्हे. अहो! एक गार म्हणजे क्रिकेटच्या सिझन्ड बॉल सारखी. आम्ही आत मध्ये बसलो होतो म्हणून ठीक नाहीतर बाहेर असतो तर त्या गारांनी एकेकाचा कपाळ मोक्षच केला असता

मी काचेतून बाहेरच दृश्य पाहत होत बाहेरची हिरवीगार बाग पूर्ण पाढरी शुभ्र झालेली मोठ मोठया तडातडा पडणाऱ्या गाराकडे मी अगदी टक लावून पाहत होते जणू निसर्गान आमच्यावर हे पाढरे चेंडू म्हणा किंवा पाढरी फुल टाकून आमच स्वागतच केल असाव कारण तेथील एका रहिवाश्याला मी या गाराच्या पावसाबद्दल विचारल असता "असा पाऊस व एव्हढया

मोठया गाराचा पाऊस इथ मी प्रथमच पाहत आहे" असे उदगार त्या रहिवाश्याने काढले.

पाऊस कमी झाल्यावर समीरनं बाहेर जाऊन बऱ्याच गारा गोळा करून आणल्या. मग चहा कोण पितय? चहाची तहान आम्ही गारावर घालवली मी तर किती वर्षांनी या गारा चवीन खात होते लहानपणी मामाच्या, मावशीच्या गावाला जायचे तेव्हा गावाला मी या गारा आवडीनं खात असताना माझ्या लहानपणीच्या आठवणी जागृत झाल्या आणि त्याच बरोबर तोंडाला सुद्धा त्या गारानी एक आगळी-वेगळी चव आणली गारा संपवून आम्ही आमच्या रूमवर परतलो

सॅक मधल सामान काढून त्या सॅक परत केल्या इतर बूट वेगळ्या पिशवीत व्यवस्थित बाधून ठेवले आणि बॅगा व्यवस्थित भरून ठेवल्या सर्व पॅकिंग झाल्यावर आम्ही थोडावेळ बाहेर बागेत फिरत राहिलो

या ट्रेकिंगचा एक शारीरिक फायदा झाला मुख्य आळस जो आपल्या अगात असतो तो नाहीसा झाला. पहाटे लवकर उठण, सतत चालत राहाण, या गोष्टींशी मी तरी पूर्ण एकरूप झाले. त्यामुळे वेळ मिळाला तर पलगावर बसून पुस्तक वाचण्यापेक्षा किंवा झोपण्यापेक्षा बाहेर सतत फिरत राहण किंवा पायाना नुसत चालत ठेवण या गोष्टी मला जास्त आवडू लागल्या.

त्या दिवशी बागेश्वर मधील कॅम्पचा आमचा शेवटचा दिवस असल्यान 'युवाशक्ती' तर्फे आमच रात्रीच जेवण हे त्याच शेवटच त्यानतर आपण आपल्या खर्चान जेवण करायच होत. त्यामुळ आजच हे जेवण फारच स्वादिष्ट होत. दोन भाज्या, वरण, भात, लोणच, पापड, पोळी, त्यात सॅलेड, कस्टर्ड याची भर थोडक्यात म्हणजे 'चारी ठाव जेवण' म्हणजेच ताट भरून व ताटाच्या चारी बाजू भरून गेल्या होत्या. मग काय मी व सर्वांनीच त्या रुचकर व गोड जेवणावर भरपूर ताव मारला. कारण वरती

आम्ही इतके पोटभर कधी जेवलोच नव्हतो. जास्त जेवल्यावर परत भीती वाटायची. आपल्याला चालायला जमेल की नाही.

रात्री आम्ही आमच्या रूममध्येच कॅम्पफायर साजरा केला. मी, मीनाने गाणी म्हटली साईने सुदर गझल म्हणून दाखविल्या. आठ दिवसानी आज शातपणे आम्ही झापेच्या स्वाधीन झालो होतो.

# सत्तावीस मे त्र्याण्णव

बस मध्ये जागा पकडण्यासाठी सकाळी लवकर उठून आम्ही पटापट तयारी केली. आठ दिवसांनी आमचा बस प्रवास परत सुरु झाला. मध्ये एके ठिकाणी फक्त चहापाण्यासाठी बस थाबवली होती बाकी पूर्ण वेळ बस प्रवास न थाबता चालूच होता

बस वळणावळणान घाटातून चाललेली पण मला काही आता बस लागली नाही. कदाचित हा सर्व त्या हिमालयाचा परिणाम असावा

नैनीतालला पोहचण्यास आम्हाला सध्याकाळ झाली आमच्या स्वागतासाठी तेथील कॅम्पलीडर श्री व सौ जोशी हजर होतेच

"आम्ही तुमचे सर्व सामान गाडीने हॉटेलवर पोहोचते करतो. तुम्हाला काही खरेदी करायची असेल तर ती खरेदी आटपून व लागलीच जेवण करून हॉटेलवर या कारण हॉटेल फार उचावर आहे" सौ जोशी यानी आम्हास सूचना केली आम्ही त्याच्याकडून हॉटेलच नाव आणि पत्ता लिहून घेतला दोन गाड्यामध्ये सर्व सामान टाकल. आणि त्या गाड्या हॉटेलच्या दिशेन गेल्या

एका बाजूला हिरवागार डोंगर. त्या डोंगराला लागून मोठा तलाव व तलावाच्या कडेला रहदारीचा मार्ग या मार्गाच्या पलीकडे छोटे मोठी हॉटेल आणि मुख्य मेणबत्त्या, स्वेटर याची

विक्रीची दुकाने हे नैनीतालचे दृश्य होय.

आता नैनीताल म्हटल की ते सुदर रमणीय, थड हवेच हनीमून स्थळ तसच श्रीमत, रईस लोकाच हे स्थळ म्हणून ओळखल जात, तेथील सर्व लोक छान, छान पोषाखात वावरताना दिसतात अशा या सुदर स्थळी आमचा सर्वांचा अवतार अगदी पाहण्यासारखा होता

गाडीत बसून चेहरे तेलकट झालेले, केसाचे तुरे झालेले आणि कपडे सगळे चुरगळलेले या सर्व अवतारात मुख्य लक्ष वेधून घेणारी गोष्ट म्हणजे ते आमच नाक हिमालयातील वातावरणाचा मात्र सर्वांच्या नाकावर परिणाम झालेला होता सर्वांच्या तब्बेती खालावलेल्या परतु नाक चागली फुगलेली

फक्त माझीच तेव्हढी तब्बेत सुधारलेली. कारण सर्वजण मला "काय छान तब्बेत झाली आहे" म्हणून नेहमी चिडवायचे. त्या हिमालयाची कृपा? दुसरे काय इतके कष्ट करून त्याच्याजवळ गेले त्याचा माझ्यावर चागलाच परिणाम झाला. शारीरिक मानसिक, बौद्धिक सर्वच दृष्टीन, खरच मी त्या हिमायलाची ऋणी आहे

तर या नाकामुळे आमची जणू रस्त्याने चालायला नाकबदीच झालेली कारण सगळे रस्त्यातील लोक आमच्याकडे मागे वळून वळून पहायचे. कुणाचे नाक काळे, कुणाचे पूर्ण लाल तर कुणाच्या नाकाच्या पूर्ण साली निघालेल्या नव्हत्या म्हणून ते खवल्यासारख दिसायच. कुणाच जाड कुणाच फुगीर या अवस्थेत तिकडचे लोक आमच्याकडे पाहतील नाहीतर काय करतील. ते विचार सुद्धा करत असतील हि "नाग" (नाक) मडळी कोठून आली? तर असो या नाकामुळे आम्हाला कुठे खरेदीला जायला नाकच राहिल नाही

सर्वांना कडक भूक लागलेली म्हणून आम्ही प्रथम नास्ता करायच ठरवल आम्ही एका हॉटेलात गेलो. हॉटेलातले लोक सुद्धा चोरून चोरून आमच्याकडे पाहत होते भुकेन आमचा जीव अर्धमेला झाला होता त्यामुळे पुढे आलेल्या डिशवर आम्ही तुटून

पडलो जेव्हा थोड पोटात गेल तेव्हा कुठे जरा बर वाटल. तेव्हढ्यात मगलाच लक्ष त्या हॉटेलच्या मॅनेजरकडे गेल' तो डोळे फाड फाडून आमच्याकडे पाहत होता त्याला बहुतेक विचार पडला असावा

"ही अधाशासारखी खाणारी नाक कपनी कोठून आली? आणि याच्याकडे पैसे आहेत की नाही?" कारण त्यावेळी आमचा अवतारच तसा दिसत होता.

"तुम्ही जरा जा आणि त्या मॅनेजरला सागा हा सर्व ग्रुप ट्रेकिंगचा आहे . 'पिंडारी', 'काफनी' करून आले आहेत. नाही तर तो मॅनेजर काही गैरसमज करून घेईल शेवटी न राहवून मगलाने आमच्या कॅम्पलीडर गणेश बोरकरला सागितले

गणेशन त्याला सागितल असाव कारण त्यानतर हॉटेलमधून बाहेर पडेपर्यंत त्यान काही आमच्याकडे पाहिले नाही की पाहण्याच साहस केल नाही.

नैनीताल मेणबत्त्यासाठी प्रसिद्ध आहे. येथे जास्त मेणबत्त्याची विक्री होते मेणबत्त्या काही साध्या-सुध्या नाहीत. रगीबेरगी, नक्षीकाम केलेल्या तर काही कलाकुसर केलेल्या त्या विविध, रगीत मेणबत्त्या पाहून मी तर हरखूनच गेले किती मेणबत्त्या घेऊ आणि किती नाही अस झाल होत मला त्या मेणबत्त्याच्या दुकानात तर आम्ही सगळयाजणी वेड्याच झालो होतो काही मेणबत्त्या तर चक्क आपल्या उचीएव्हढ्या होत्या. बऱ्याच मेणबत्त्याची खरेदी करून आम्ही तिबेट मार्केटकडे वळलो येथे कमी किंमतीत सुदर स्वेटर विकत मिळतात

मी मला एक सुदर स्वेटर घेतला माझ्याकडे खर तर स्वेटर नव्हताच हिमालयात येताना मी मगलाचा स्वेटर घेतला होता मी ठरवल होत स्वेटर घेतला तर दिल्ली, नैनीताल इथच घ्यायचा आणि आज मला स्वेटर खरेदीची सधी लाभली सासूबाईना एक सुदर शाल घेतली अशोकना एक शर्ट व सजलसाठी एक ड्रेस घेतला. थोडक्यात पण आटोपशीर खरेदी केली मी. या खरेदीन सर्वाच ओझ वाढलं व पैशाचे पाकीट हलक झाल हे सागायलाच नको



नैनिताल नौका विहार



पिंडारी बर्फाचे मैदान

खरेदी झाल्यावर थोडस खाऊन आम्ही हॉटेलवर परतलो. हॉटेल बरच उचावर होत. येथील सर्व घर पण उचावरच आहेत हॉटेलमध्ये पोहचल्यावर मी प्रथम डोक्यावरून स्वच्छ आघोळ केली गाडीत बसून, फिरून अग नुसत आबून गेलं होत आघोळ केल्यावर जरा प्रसन्न वाटल नतर मंगलान व मी सर्व सामान चापून चोपून भरल आमच्या दोघींचे मिळून एकूण आठ बोझे झाले होते ते बोझे कसे वाहयचे याची मला चिता पडली होती. उद्या सध्याकाळी आम्हाला ६ वाजता येथून दिल्लीस निघायचं होत. म्हणजे उद्याचा सहापर्यंतचा पूर्ण दिवस आमचा नैनीतालसाठीच होता. नैनीताल जेव्हढे पाहता येईल तेव्हढे पाहून घ्यायचे आम्ही ठरवल.

आज आम्ही प्रवासान, खरेदीन, दगदगीन फारच थकलो होतो त्यामुळ लगेच आम्ही गुपचूप झोपून घेतल फक्त पलगावर अग टाकायचीच खोटी होती आमचा डोळा कधी लागला ते कळलच नाही.

# अठ्ठावीस मे त्र्याण्णव

सकाळी जरा लवकरच उठलो तयारी करून आम्ही नैनीताल पाहण्यास निघालो आज मात्र आम्ही टिपटॉप मध्ये होतो. कालचे ते हेच का? असे कोणीही म्हटल असत.

प्रथम एका हॉटेलात जाऊन आम्ही नास्ता करायच ठरवल. तेथे कुठेच सिंगल आम्लेट मिळत नाही घेतले तर डबल आम्लेटच घ्याव लागत. ब्रेड-आम्लेट खाऊन वर गरम चहा ढोसून आम्ही फिरावयास मोकळे झालो

प्रथम आम्ही सायकल रिक्षात बसून रोपवेकडे निघालो रोपवे म्हणजे हवाई पाळणा सायकल रिक्षात मला अवघडल्या सारख झाल होत कारण आपण आरामात बसलोय आणि आपल्यासारखाच एक मनुष्य प्राणी घाम गाळत ती रिक्षा ओढतोय हे दृश्य काही मला पाहवत नव्हत.

रोपवे ची तिकिटे काढून आम्ही रांगेत बसलो थोड्यावेळान आमचा नंबर लागला त्या हवाई पाळण्यात बसल्यावर माझी मात्र हवा निघून जाते की काय असे वाटत होत.

जसा जसा पाळणा वर जात होता तस तसे माझे डोळे फिरत होते नंतर मात्र मी डोळे गच्च बंद करून घेतले थोड्यावेळान मोठा आवाज ऐकू आला. धडाम् माझ्या छातीत धस्स् झाल पण तो आवाज म्हणजे पाळणा वर पोहचला होता आणि आतला माणूस धाड्कन दरवाजा उघडत होता

तेथे वरती आम्हाला फिरण्यास अर्ध्यातासाचा अवधी

दिला वरून सपूर्ण नैनीतालच दर्शन घडत. खाली दिसत असलेल्या तलावाचा आकार हा डोळयाप्रमाण म्हणजेच नयनाकार आहे म्हणून या स्थळाला नैनीताल असे म्हणतात अस नंतर कळल तेथून आम्हाला चायनपिग हा पॉईंट ढगामुळ काही दिसू शकला नाही वरती एक सुदर मदिर आहे या मदिरात राम, लक्ष्मण, सीता, शकर, गणपती, दुर्गादेवी याच्या मूर्ती आहेत देवाच दर्शन घेऊन तेथून वरून दिसणार सृष्टीसौंदर्य पाहून आम्ही परत खाली जाण्यासाठी रोपवेकडे निघालो धडधडत्या छातीने मी त्या रोपवेतून एकदाची खाली येऊन पोहचले

तलावाच्या कडेलाच नैनादेवीच मोठ मदिर आहे. या मदिरात शकराची पिंड तसेच राधाकृष्णाच्या सुदर मूर्ती आहेत नैनादेवीला नमस्कार करून थोडी फार राहिलेली खरेदी उरकून आम्ही लेकवर निघालो

येथे बोटिंगची पण मजा लुटली. खाली निळगार पाणी व एका बाजूला उच डोंगर त्यावर गर्द हिरवी झाडी हे दृश्य डोळयास थडावा देत होत बोटिंग झाल्यावर आम्ही आमच्या हॉटेलवर परतलो. परत एकदा सामानाची तपासणी करून, सामान उचलून आम्ही बसस्टॅन्डवर निघालो बस बरोबर सहा वाजता आली आणि वेळेवर साडेसहाला सुटली

आम्ही बसमधून निघालो त्यावेळी तेथे फारच धुक आलेल होत. तलाव तर पूर्ण धुक्यानी भरून गेला होता. माणूस जसा काही ढगातच वावरत आहे किंवा या ढगातच मनुष्यवस्ती आहे अस वाटू लागल बस सुटल्यावर आम्ही आमच्या कॅम्पलीडरचा निरोप घेतला आणि पुन्हा एकदा त्या सुदर नैनीतालला आपल्या नयनात बदिस्त करून घेतल

# एकोणतीस मे त्र्याण्णव

आमचा हा बसप्रवास संपूर्ण झोपेतच गेला पहाटे अडीच तीनच्या सुमारास आम्ही दिल्लीत पोहचलो आमची गाडी म्हणजे, झेलम एक्सप्रेस साडेदहाला होती. साडेदहापर्यंत सगळेजण प्रतीक्षा कक्षात जाऊन गाडीची प्रतीक्षा करीत बसलो माझी तर झोप काही अजून उडाली नव्हती सामानावर हात पाय पसरून मी डुलक्याच काढीत होते

मंगलान अखेर मला झोपेतून जाग केल आम्ही दिल्ली स्टेशनच्या बाहेर आलो. बाहेर आल्यावर आम्ही तिथे एका छोट्या हॉटेलमध्ये चहा घेतला चहा घेतल्यावर माझी झोप उडालीच

आपल्याकडे पहाटे चार पाच वाजल्यापासून रहदारीस सुरूवात होते लोक गडबडीने कामावर जाताना दिसतात पण तेथे आठ वाजले तरी सर्व काही चिडीचूप आणि शांत दिसत होते.

दिल्ली स्टेशनच्या बाहेर मंगलान एक सुंदर, नक्षीकाम केलेली मातीची सुरई विकत घेतली, इथं पण तिने खरेदीची संधी दवडली नाही

अखेर साडेदहाला झेलम एक्सप्रेसमध्ये आम्ही आमच्या सामनासकट चढलो. आता मी खरोखरच मुंबईला परतण्यासाठी गाडीत बसले होते. आता घरच्याची पण ओढ लागली होती. कधी एकदा लवकर घरी पोहचते अस झाल होत मला

गाडी पुढे पुढे जात होती. माझ मन मात्र मागे मागे गुंतत होत. 'पिंडारी' 'काफनी' 'बागेश्वर' 'नैनीताल' हळू हळू मागे

पडत चालल होत परतु ते आता माझ्या मनाच्या कप्यात रुतून बसलेले होते

ते बर्फाळ क्षण, ढगाळ क्षण, विसरण अशक्यच होत माझ्या दृष्टीने ते सोनेरी क्षण होते हे सर्व सोनेरी क्षण डोळयात टिपून, मनात साठवून मी परतीच्या मार्गाला लागले होते. गाडीतला वेळ आता त्याच्या स्मृतीत घालवीत होते

तो हिमालय, ती हिमालयाची वाट दूर होत गेली किंवा धूसर होत चालली तरी माझ्या हृदयात मात्र ती सतत माझ्याशी हितगुज करीत राहील यात शकाच नाही

अशा तऱ्हेने हिमालयाच्या कुशीत जाऊन आलेली मी सह्याद्रीची लेक पुन्हा आपल्या कल्याणच्या घरी परतले

REFBK-0027368


पिंडारी - काफनी -